# पंढरी संचार

पंढरपूर • गुरुवार, २६ डिसेंबर २०२४ • किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | वर्ष २९ • अंक - २१६





रांझणी गावात पोलिसांचा छापा; 3,27,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त PII





नागरिकांनी सेतू कार्यालयात दरपत्रकानुसार पैसे द्यावेत - तहसीलदार PIII


# निरंतर नि:शुल्क ऊर्जा

## सौर कृषी वाहिनी 2.0 चे उद्घाटन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने नव्या वर्षात शेतकऱ्यांसाठी मोठी भेट दिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - २.० ची घोषणा केली आहे. सौर उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती निर्माण करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकतात, असा विश्वास देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या योजनेबाबत सविस्तर माहिती दिली आहे. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करुन देणे हा आहे. मुख्यमंत्री सौर कृषी फीडर योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसाठी निरंतर सौर उर्जा मिळेल. राज्यात सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांसाठी १६,००० मेगावॅट वीज देण्यात येते. गेल्या दोन वर्षात सर्व फीडर सौर उर्जेत बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सौर कृषी प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले, ज्यात मुख्य सचिव सुजाता सौनिक, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर आणि इतर अनेक वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात उंब्रठा व नारंगवाडी गावातील शेतकरी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी उंबरठा (जि. वाशिम) आणि नारंगवाडी (जि. धाराशिव) येथील सौर कृषी प्रकल्पांचे उद्घाटन केले. यावेळी उंब्रठा आणि नारंगवाडी गावातील शेतकऱ्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे


» पान ३ वर

### दुसरी हरित क्रांती

● महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती निर्माण करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका देखील निभावू शकतात. तसेच या महत्वपूर्ण योजनेचा उद्देष राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करुन देण्याचा असणार आहे. याशिवाय या योजनेच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी निरंतर सौर उर्जा देखील मिळणार आहे. तसेच राज्यात सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांसाठी तब्बल१६,००० मेगावॅट वीज देखील देण्यात येते. मात्र गेल्या दोन वर्षात सर्व फीडर सौर उर्जेत बदलण्याचा प्रयत्न केला जात

# रशियाला जाणारे विमान कोसळले!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अझरबैजानहून रशियाला जाणारे विमान प्रवासी विमान कझाकिस्तानमध्ये कोसळून अपघात झाला. या विमानातून सुमारे १०५ प्रवासी आणि पाच क्रु मेंबर असे १०७ लोक प्रवास करत होते. कझाकिस्तानच्या आपत्कालीन मंत्रालयाने, या दुर्घटनेत ४२ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली आहे. तर कझाक परिवहन मंत्रालयाने सांगितले आहे की या अपघातातून २५ जण बचावले आहेत. हे विमान अझरबैजानमधील बाकू येथून रशियातील चेचन्याची राजधानी ग्रोझनी येथे जात होते. पक्ष्यांचा थवा विमानावर आदळल्याने विमानामध्ये बिघाड झाला. कझाकस्तानमधील अॅक्टाऊ शहराजवळ भीषण विमान दुर्घटना झाली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल

» पान ३ वर

### विमानात १०५ प्रवासी

विमानात १०५ प्रवासी आणि ५ क्रू मेंबर्स होते. विमान कोसळल्यानंतर सोशल मीडियावर विमान कोसळल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहे. हे दृश्य भयानक आहे तसेच अपघाताची तीव्रता यामुळे कळत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओत हवेत असलेले विमान जमिनीच्या दिशेने येऊन ते खाली आदळल्याचे दिसत आहे. यानंतर मोठा स्फोट होऊन विमानाला आग लागली आहे. विमानाच्या तुटलेल्या भागाजवळ आपत्कालीन बचावपथक असून या घटनेत बचावलेल्यांना ते बाहेर काढण्याचा प्रयत्न करत असल्याचे देखील व्हायरल व्हिडिओत दिसत आहे.

## » At a Glance

### 11 अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिले शामची आई पुस्तक भेट



**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कॉन्सील हॉल येथे साने गुरुजी यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहा. आयुक्त गिरीष पंडित यांनी केले. यावेळी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित असलेल्यांमधून 11 लकी ड्रॉ द्वारे नावे काढण्यात आली. त्या सर्व 11 अधिकारी व कर्मचारी यांना साने गुरुजी लिखित शामची आई हे पुस्तक भेट देण्यात आले. त्यानंतर उपायुक्त आशिष लोखरे यांनी साने गुरुजी यांच्याविषयी माहिती सांगितली.

### पालकमंत्रिपदाच्या चर्चेत नवे नाव?



**सोलापूर :** जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची निवड होईल, असे भाजपचे ग्रामीण भागातील नेते सांगतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माढा लोकसभा मतदारसंघात नव्या राजकारणाची मांडणी करीत आहेत. या दृष्टीने ही निवड होईल, असे भाजप नेत्यांचे म्हणणे आहे. भाजपच्या शहरातील नेत्यांनी यावर काहीही भाष्य केलेले नाही, मात्र माजी पदाधिकाऱ्यांनी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची पालकमंत्रिपदी निवड होऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला. दुसरा एक गट चंद्रकांत पाटील यांनाच पालकमंत्रिपद मिळावे यासाठी प्रयत्नशील आहे.

### मुदत संपली उत्तराकडे लक्ष



**अकलूज :** आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्यावर पक्षाच्या विरोधात काम केल्याचा ठपका ठेऊन भाजपने शिस्तभंगाची नोटीस बजावली होती. सात दिवसांत स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले होते. दि. १६ डिसेंबर रोजी नोटीस देण्यात आली होती. खुलासा करण्याची मुदत आता संपली आहे. सात दिवसांत रणजितदादांनी खुलासा सादर केला की नाही, याची चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान, मोहिते-पाटील समर्थकांनी राज्यात अनेक नेते पक्षाच्या विरोधात काम केलेले आहेत. त्यांतील काहीजणांना मंत्रिपदे देण्यात आली आहेत.


### भोयरे खूनप्रकरणी तिघांना अटक

**बार्शी :** भोयरे (ता. बार्शी) येथील शेतीच्या वाटेच्या भांडणावरुन पुतण्यानेच धारदार हत्याराने त्याचा चुलत्यास जखमी तर त्यांचा मुलगा व चुलती अशा दोघांना ठार केल्याप्रकरणी तालुका पोलिसांनी एका महिलेसह तिघांना अटक करुन खुनाचा गुन्हा दाखल केला. न्यायालयात उभे केले असता २९ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी. व्ही. राऊत यांनी दिले. सौदागरपाटील, सोनाली पाटील, निर्मला पाटील (सर्व रा. भोयरे, ता. बार्शी) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. नानासाहेब पाटील यांनी फिर्याद दाखल केली.

#### पीएमपी प्रशासनाचा निर्णय : प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

# बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गेल्या काही दिवसापासून बसमध्ये महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडल्या तर काही चोरीच्या घटना घडल्याने आता प्रशासन खडबडून जागे झाले आहे. अशीच नुकतीच घटना घडली ती म्हणजे स्वारगेटहून वाकडेवाडीकडे जाणाऱ्या बसमध्ये पुरुषाने महिला प्रवाशाला छेडल्याने चोप दिल्याची घटना नुकतीच घडली. या सर्व पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पीएमपी प्रशासनाने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात पीएमपीच्या मालकीच्या सुमारे १००६ बसेसमध्ये प्रत्येकी तीन कॅमेरे बसविले जाणार आहेत. याच्या निविदा प्रक्रियेचे काम सुरू असून,येत्या दोन महिन्यात प्रत्येक बसमध्ये कॅमेरे बसविले जाणार आहेत. पीएमपीच्या ताफ्यात २१०० बस असल्या तरीही प्रत्यक्षात रस्त्यावर १६५० बस धावत आहेत.पैकी १००६ बस पीएमपीच्या मालकीच्या आहेत. उर्वरित बस भाडेतत्त्वावरील आहेत. पीएमपी प्रशासन पहिल्यांदाच मालकीच्या बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवीत आहेत. पीएमपी बसमधून दररोज सुमारे १३ लाख प्रवासी प्रवास करतात. पैकी १००६ बसमध्ये टप्प्याटप्प्याने कॅमेरे बसविले जाणार असल्याने किमान ९ लाख प्रवासी प्रशासनाच्या नजरेत राहणार आहेत.



### नजिक पिंपरीतील तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील नजिक पिंपरी येथील तरुणाने सोलापुरात आत्महत्येचा प्रयत्न केला. कल्याण श्रीमंत वाघमोडे (वय २५) असे तरुणाचे नाव आहे. कल्याण हा मंगळवारी आसरा चौकातील मैदानात आला. त्याने अज्ञात कारणातून सोबत आणलेले विषारी औषध प्राशन केले. त्यात त्रास होऊ लागल्याने सकाळी १० वाजता रमेश माशाळ यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# मंगळुरूसाठी विमानसेवा सुरु करण्याची घोषणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विमानतळाने हिवाळी वेळापत्रकात या नवीन आंतरराष्ट्रीय उड्डाणांचे नियोजन केले होते. इंडिगो एअरलाइन्सने पुण्याहून बँकॉकसाठी थेट विमानसेवा गेल्या महिन्यात सुरू केली. याचबरोबर इंडिगोनेच पुणे ते दुबई थेट विमानसेवा सुरू केली आहे. आता एअर इंडिया एक्स्प्रेसने पुणे - बँकाक थेट विमानसेवा सुरु केली आहे. याचबरोबर एअर इंडिया एक्स्प्रेसने पुण्यातून मंगळुरूसाठी थेट विमानसेवा सुरु करण्याची घोषणाही केली आहे.


पुण्याहून देशांतर्गतसह आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमान उड्डाणांमध्ये आता आणखी वाढ झाली आहे. पुण्यातून बँकॉकसाठी थेट विमानसेवा नोव्हेंबरमध्ये सुरू झाली होती. यात आता आणखी एका आंतरराष्ट्रीय उड्डाणाची भर पडली आहे. यामुळे पुण्यातून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या आता पाच झाली आहे.

एअर इंडिया एक्स्प्रेसची पुणे बँकॉक सेवा गुरुवार शुक्रवार शनिवारी असेल. हे विमान पुण्यातून सकाळी ८.४० वाजता उड्डाण करेल आणि दुपारी २.३० वाजता बँकॉकमध्ये पोहोचेल. हे विमान बँकॉकमधून दुपारी ३.३५ वाजता उड्डाण करेल आणि पुण्यात सायंकाळी सहा ६.२५ वाजता पोहोचेल. याचबरोबर एअर इंडिया एक्स्प्रेस पुणे मंगळूर ही थेट विमानसेवा ४ जानेवारीपासून सुरू करीत आहे. या मार्गावर दर शनिवारी दोन विमान फेऱ्या होणार आहेत.

» पान ३ वर

# तरुणीवर चार जिल्ह्यात चौघांनी केला बलात्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कात्रज भागात दहशत माजविणारा गुंड तौसिफ उर्फ जमीर सय्यद उर्फ चूहा याच्यासह साथीदारांविरुद्ध आंबेगाव पोलिसांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण (मोक्का) कायद्यान्वये कारवाई केली. आरोपींनी अमली पदार्थांची खरेदी विक्री, खूनाचा प्रयत्न, दरोडा, मारामारी असे गंभीर गुन्हे केले आहेत. टोळीप्रमुख तौसिफ जमीर सय्यद उर्फ चूहा (वय २८, रा. संतोषनगर, कात्रज), सूरज राजेंद्र जाधव (वय ३५), मार्कस डेव्हीड इसार (वय २९), कुणाल कमलेश जाधव (वय २५) अशी मोक्का कारवाई केलेल्यांची नावे आहेत. टोळीप्रमुख तौसीफ उर्फ चूहा याने टोळी तयार केली. संघटितरित्या त्याने गंभीर गुन्हे केले. तौसिफ कात्रज भागातील तरुण मुलांना हेरुन त्यांना अमली पदार्थ सेवन करण्यासाठी प्रवृत्त करत होता. त्यांना गुन्हेगारी टोळीत सामील करून दहशत माजविण्याचे गुन्हे त्याने केले होते. तौसिफ आणि साथीदारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्याच्या वर्तनात सुधारणा झाली नव्हती. त्यामुळे त्याच्याविरुद्ध मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्याचा प्रस्ताव आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झीने यांनी तयार केला. परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांच्यामार्फत हा प्रस्ताव अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील यांच्याकडे पाठविण्यात आला. या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी देण्यात आली. सहायक पोलीस आयुक्त राहुल आवारे तपास करत आहेत.

### तरुणास मारहाण; पोलिसात गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** मुलीसोबत फिरताना पहिल्याने चिडून लोखंडी पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून एका तरुणास जखमी केल्याचा प्रकार 22 डिसेंबरच्या रात्री 11 वाजता पाथरूट चौकात घडला. अजय राजू अडसुळे (वय 29, रा. न्यू पश्चा पेठ, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून तुषार मल्हारी शिंदे व सौदागर क्षीरसागर (दोघे राहणार सोलापूर) या दोघांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पोलीसांनी कोणासही अटक केली नाही. याबाबतचा पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

## रेल्वे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

# रेल्वे डब्यांची संख्या कमी असल्याने प्रवाशांचे हाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही महिन्यांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, मुंबई येथील प्लॅटफॉर्म नंबर १० आणि ११ चे विस्तारीकरण करण्यात आले. यामुळे पुणे-मुंबईदरम्यान धावणाऱ्या सिंहगड, डेक्कन क्वीन, प्रगती या गाड्यांचे डबे वाढविण्यात येणार होते; परंतु काम पूर्ण होऊनही डब्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय मात्र अजून झाला नाही. त्यामुळे प्रवाशांना धक्के खात प्रवास करावा लागत आहे. पुणे-मुंबईदरम्यान दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त आहे; परंतु सिंहगड, डेक्कन क्वीन, प्रगती या प्रमुख गाड्यांच्या डब्यांची संख्या कमी असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत.

पुणे-मुंबईदरम्यान दररोज हजारोंच्या संख्येने चाकरमानी ये-जा करतात; परंतु सध्या या मार्गावर धावणाऱ्या प्रमुख गाड्यांना १६ डबे आहेत. तुलनेत प्रवासी संख्या मात्र जास्त आहे. त्यामुळे जागा अपुरी पडत आहे. परिणामी वादाचे प्रसंग घडत आहेत. या प्रमुख गाड्यांच्या डब्यांची संख्या २४ करणे गरजेचे आहे. वाढत्या प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन मुंबईतील फलाटांचे विस्तारीकरण करण्यात आले. त्यामुळे या प्रमुख गाड्यांच्या डब्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात आला; परंतु त्याची अंमलबजावणी अजून झाली नाही. त्यामुळे प्रवाशांना आहे त्या गाड्यांमध्ये धक्के खात प्रवास करण्याशिवाय पर्याय नाही.

सकाळच्या सत्रात नोकरी व कामानिमित्त दैनंदिन ये-जा करणारे प्रवासी पास काढून प्रवास करतात. त्यामुळे त्यांची जागा राखीव असते; परंतु या डब्यांमध्ये एकादा नवीन प्रवासी बसला आणि पासधारक आले तर जागेवरून उठावे लागते. अशा वेळी वादावादी होतात. काही वेळा सिंहगड एक्स्प्रेसमध्ये हाणामारीदेखील झाली आहे. रेल्वेला कायम गर्दी असते. त्यामुळे वादावादीचे प्रसंग टाळायचे असतील, तर प्रशासनाला रेल्वे गाड्यांचे डबे वाढविणे गरजेचे आहे. सध्या पुण्यातून धावणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये जनरल डबे वाढविण्यात येत आहेत. झेलम एक्स्प्रेस व इतर दोन-तीन प्रमुख गाड्यांचे डबे बदलून वाढविण्यात आले आहे, तसेच एलएचबी कोच लावण्यात येत आहे. पुढील काही महिन्यांत पुणे ते मुंबईदरम्यान धावणाऱ्या गाड्यांचे डबेदेखील क्रमशः वाढविण्यात येतील.

> “ एसटी आणि ट्रॅव्हल्सचे तिकीट दर जास्त आहे. त्यामुळे पुणे-मुंबईदरम्यान रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून प्रमुख गाड्यांचे डबे १६ वरून २४ करावेत, अशी आमची मागणी आहे; परंतु रेल्वे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे अनेकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.
>
> — **हर्षा शहा,** प्रवासी संघ, पुणे


## वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

‘ दै.पंढरी संचार ’

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९८९०९७६४७५

बुकिंग मर्यादा २८ डिसेंबरपर्यंत.

**सोलापूर :** सोलापूर एसटी बसस्थानक परिसरात अचानक चक्कर येऊन पडल्याने मुंबई येथील एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना 23 डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. सोमनाथ गंगाराम साबणे (वय 20 रा. सिद्धिविनायक चौक, पिंचपाडा, मुंबई) असे मृत तरुणाचे नाव आहे. सोमनाथ हा कामानिमित्त सोमवारी सोलापुरात आला होता. दुपारी एसटी स्थानकात त्याला चक्कर आल्याने तो खाली पडला. त्यातच तो बेशुद्ध पडल्याने मामा संभाजी खरटमल यांनी त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत्यू पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### श्री शंकर सहकारी साखर कारखाना सन २०२४ - २५ च्या

# गळीत हंगामातील १ लाख १ व्या साखर पोत्याचे पूजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** सोमवार दि. २३/१२/२०२४ रोजी श्री शंभू महादेवाच्या कृपेने व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री शंकर सहकारी चे चेअरमन तथा विधानपरिषद आमदार मा. श्री रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रगतीपथावर असलेला श्री शंकर सहकारी साखर कारखाना सन २०२४ - २५ च्या गळीत हंगामातील १ लाख १ व्या साखर पोत्याचे पूजन महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.
यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा. श्री. मदनसिंह मोहिते पाटील, श्री शंकर सहकारी चे चेअरमन मा. श्री. रणजितसिंह मोहिते पाटील, व्हा. चेअरमन मा. श्री. ॲड. मिलिंद कुलकर्णी, पंचायत समितीचे माजी उपसभापती मा. श्री. अर्जुनसिंह मोहिते पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, अनंतलाल दोशी, विठ्ठल तात्या अर्जुन, विलास निंबाळकर, विष्णू घाडगे, सरपंच विरकुमार दोशी, उपसरपंच देविदास दोपे, उदय धाईंजे, एकनाथ वाघमोडे, अभिमान सावंत, शेतकरी संघटनेचे दत्ता भोसले, माऊली निंबाळकर, शांतीनिकेतन साळवे, हुसैन मुलाणी, सागर उरवणे, शंकर सहकारीचे संचालक रामदास कर्णे, ॲड. सुरेश पाटील, रणजित पाटील, हनुमंत सरगर, सुनील माने, सचिन लोकरे, दत्तात्रय मिसाळ, विक्रम पाटील, सौ लिलावती देवकर, कार्यकारी संचालक अभिजित डुबल, जनरल मॅनेजर रविराज जगताप, चिफ इजिनियर समाधान कागदे, चिफ केमिस्ट महेश थोरात, डिस्टीलरी विभाग प्रमुख संजय मोरे, संगणक विभाग प्रमुख आनंदराव देवकर, शेतकी अधिकारी आनंदराव गायकवाड, अतुल नाईकनवरे, सिव्हिल विभाग प्रमुख राहुल मगर, सुरक्षा विभाग प्रमुख ज्ञानदेव पवार, स्टोअर विभाग प्रमुख उदय पाटील, पर्चेज विभाग प्रमुख सपकाळ साहेब, चिफ अकाऊंटट साधू शेंडगे तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, शेतकरी सभासद तसेच सदाशिवनगर, पुरंदावडे, येळीव, जाधववाडी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छगन भुजबळांनी टायमिंग साधलं नाही



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** हंगाम आणि वेळ बघून छगन भुजबळांनी पेरणी करायला हवी होती. आता वेळ निघून गेली आहे, असा टोला ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी लगावला आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके पंढरपुरात आले होते. यावेळी त्यांनी छगन भुजबळ यांच्या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी ढलपी काढली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ तथा ओबीसी नेते छगन भुजबळ हे महायुतीसरकारच्या मंत्रिमंडळात डावलल्याने नाराज आहेत. नाराज छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मराठा आरक्षणाच्यावेळी मनोज जरांगे पाटील यांना कडाडून विरोध केला होता. ते या आंदोलनामध्ये आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

Selected

## कंदर येथे कंटेनरची दुचाकीला धडक




**करमाळा :** करमाळा – टेंभुर्णी महामार्गावर कंदर येथील सदगुरु मंगल कार्यालयासमोर भरधाव वेगाने आलेल्या एका कंटेनरने मोटरसायकलला धडक दिली आहे. यामध्ये वांगी नंबर 2 येथील ही मोटरसायकल असून त्यावरील दोघेजण जखमी झाले आहेत. गणपत महादेव चौधरी व नवनाथ शिंदे अशी जखमींची नावे आहेत. हे दोघेही जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात पावणेदोन वाजताच्या सुमारास झाला आहे.

## अ. भा. वि. प. च्या शोभयात्रेवर केली पुष्पवृष्टी



**सोलापूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने संमेलनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात सर्वत्र शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभा यात्रेत दीड हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या यात्रेत वाद्य, बग्गी आणि पारंपरिक वेशभूषा परिधान केलेले युवक - युवती सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान येथे या पदयात्रेचे आगमन होताच फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. तसेच भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव संदीप जाधव मित्र परिवाराच्या वतीने शोभा यात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

## शेतकऱ्यानं एका एकरात ५ लाखांचं उत्पन्न घेतलं



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजित पाटील यांनी एका शेतकऱ्याचं कौतुक केलं आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यानं एका एकरात 5 लाखांचं उत्पन्न घेतल्याबद्दल अभिजित पाटील यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. माढा मतदारसंघातील पडसाळी गावातील महेश पाटील यांनी एका एकरातील कांदा विक्रीतून 5 लाखांचं उत्पन्न मिळवलं असून त्यांना अजून 3 एकरातील कांदा विक्रीतून 15 लाख रुपयांचं उत्पन्न मिळण्याची आशा आहे. करताना डोळ्यात पाणी आणणाऱ्या कांद्यानं चेहऱ्यावर हास्य फुलवलं, असं म्हटलंय.

## बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा



**सोलापूर :** द्राक्षापासून तयार होणाऱ्या बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. कारण केंद्र सरकारने बेदाण्याला आता कृषी मालाचा दर्जा देण्यास मंजुरी दिली आहे. याशिवाय बेदाणा आता जीएसटी मुक्त करण्यात आला असून परिषदेमध्ये बेदाण्यावर आकारला जाणारा पाच टक्के जीएसटी रद्द केला आहे. द्राक्षापासून तयार होणाऱ्या मद्याला कृषी उत्पादनाचा दर्जा देत वस्तू व सेवा करातून वगळण्यात यावे; अशा महाराष्ट्राच्या मागणीला यश आले असून वस्तू सेवा कर परिषदेतमध्ये मद्य करमुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## दर्शन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अक्कलकोट :** अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी झालेली बघायला मिळत आहे. सिंह चौकापर्यंत दर्शन रांग लागली होती. नाताळ सुट्टीमुळे देखील भाविकांच्या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता मंदिर प्रशासनाने वर्तवली आहे. स्वामी भक्तांची संख्या वाढल्याने देवस्थानचे अन्नछत्र आणि भक्तनिवास देखील फुल्ल झाले आहेत. सिने अभिनेत्री केतकी माटेगावकर यांनीही स्वामींचे दर्शन घेतले आहे.

## आ. देशमुख यांच्या मागणीची घेतली दखल



**सोलापूर :** विद्यार्थ्यांसाठीच्या गणवेशासाठी एकाच कंपनीकडून कोट्यवधी रुपयांचे कापड खरेदी करण्याचा निर्णय आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलला आहे. आता शाळा व्यवस्थापन समितीला कापड खरेदीसाठी निधी दिला जाईल आणि ही समिती गणवेश शिवून विद्यार्थ्यांना देणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आता सोलापूरच्या गारमेंट क्षेत्राला चालना मिळणार आहे. आ. सुभाष देशमुख यांनी याबाबत वारंवार पाठपुरावा केला होता. अखेर त्याची दखल सरकारने घेतली आहे. सरकारच्या या निर्णयाचे आ. देशमुख यांनी स्वागत केले आहे.

## सुशासन दिनानिमित्त विविध कार्यक्रम



**सोलापूर :** भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी व सुशासन दिनानिमित्त आयोजित भाजपा सदस्यता अभियानात भाजपचे सोलापूर शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी सहभागी होऊन मार्गदर्शन केले. तसेच प्रभाग क्र. १७ येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे योजनेअंतर्गत पाण्याची पाइपलाइन आणि ड्रेनेज लाइन घालणे या विविध विकासकामांचे उद्घाटन काळे यांनी केले. यावेळी पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, अनंत गोडलोलू, रेणुका गोडलोलू, राजाभाऊ माने, अविनाश बेंजरपे, मारेप्पा कंपल्ली, बाबुराव संगेपांग आदी उपस्थित होते.

### अण्णासाहेब पाटोळे यांची

## दलित स्वयंसेवक संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील देवडी येथील अण्णासाहेब पाटोळे यांची दलित स्वयंसेवक संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. संघप्रमुख राजाभाऊ धडे यांनी लेखी पत्र देऊन त्यांची निवड केली .
अण्णासाहेब पाटोळे हे मोहोळ तालुक्यातील ग्रामीण भागातील देवडी येथील असून ते प्रमाणित लेखा परीक्षक म्हणून काम करित आहेत.
अभ्यासू व्यक्तीमत्व असणारे पाटोळे यांना समाजाची चांगली जाण समाज सेवेची आवड असून त्यांच्या कामाची पोच पावती म्हणून त्यांची सोलापूर जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी संजय केंद्रे तानाजी रणदिवे, नानासाहेब मोरे, आनंद जाधव, अशोक कांबळे, बाळासाहेब हजारे, गायकवाड, सुरेश उमाप, सुरेश लोखंडे, सिद्धाप्पा श्रीकांत ऐवळे, आप्पा शिंदे ,अशोक देडे, विनोद अ राजाभाऊ क्षीरसागर, चंद्रकांत थोरात,श्रीशैल कट्टीमनी आदी सह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## जादा नफ्याच्या आमिषाने महिलेस 30 लाखांचा गंडा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सर्वसामान्यांसाठी रिटेल क्षेत्रात यशाचा आणि लाखोंच्या कमाईचा एक्सलेंट मार्ग अशी जाहिरात प्रसिद्ध करून महिन्यात लाखो रुपये मिळतील असे जादा पैशाचे आमीष दाखवले. त्यातून 30 लाख रुपयांचा गंडा घातला. याप्रकरणी मनीषा विष्णू मोंढे यांनी सदर बाझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून सचिन मलिक पाटील (रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## शासकीय विभागाच्या योजनांची नागरिकांना माहिती द्या



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापुरात जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती नागरिकांना व्हावी यासाठी लावण्यात आलेल्या स्टॉलचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी फित कापून केले. तसेच त्यांनी येथील प्रत्येक स्टॉलला भेट देऊन माहिती घेतली. तसेच येथे येणाऱ्या नागरिकांना विविध शासकीय योजनेची सविस्तर माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना तात्काळ लाभ द्यावा, असेही त्यांनी सूचित केले.

## नगरपालिकेकडून दूषित पाणीपुरवठा



**करमाळा :** करमाळा शहरातील अनेक भागांत नगरपालिकेकडून दूषित पाणीपुरवठा केला. नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही करमाळा नगरपालिकेचे दुर्लक्ष करत असल्याचा नागरिकांचा आरोप केला. करमाळा शहरातील बऱ्याच ठिकाणी दूषित पाणीपुरवठा होत आहे. नगरपालिका शहरातील पाणीपुरवठा नळाला फेसाळयुक्त, गाळयुक्त व काळे पाणी येत असल्याने करमाळा शहरवासिय हैराण, दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात, करमाळा नगरपालिकेकडून स्वच्छ पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आले.




### पंढरपूर पोलीसांची अवैध दारू विक्रीवर कारवाई

# रांझणी गावात पोलिसांचा छापा; 3,27,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रांजणी या गावी २३ डिंसेबर रोजी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांना मिळालेल्या माहितीनुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एच.डी.पी.ओ सोलापूर कार्यालय स्टॉप व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन स्टाफ यांच्या एकत्रित कारवाई करीत मौजे रांजणी गावात सदर कारवाई करण्यात आली.
यावेळी घटना स्थळी प्रदीप अवताडे यांचे राहते घरी कारवाई वेळी जिन्याखाली देशी दारूचे एकुण ९६ बॉक्स अवैधरित्या बाळगलेल्या स्थितीत आढळून आले आहेत सदर आरोपी प्रदीप अवताडे यांच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.तसेच सर्व ९६ बॉक्स दारू जप्त करण्यात आले असून सदर देशी दारूची एकूण किंमत ३,२७,००० ( तीन लाख २७ हजार रुपये) इतकी आहे. सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस कॉन्स्टेबल रोंगे, ए एस आय तोडले, पोलीस हेडकॉन्स्टेबल रोकडे यांच्या पथकाने केली सदर कारवाई आहे.

**सांगोला :** सांगोला वनपरिक्षेत्र आधिकारी वनपाल व वनरक्षक फिरतीवर होते. त्यावेळी ट्रॅक्टरची तपासणी केली असता विनापरवाना वृक्षतोड करून ट्रॅक्टर ट्रॉलीमधून विना परवाना वाहतूक करताना आढळले. आंबा झाडाचे सुमारे २० हजार रुपये किंमतीचे ६ नग लाकूड माल जप्त केले. घेरडी वनरक्षक एस. एस. मुंढे यांनी शेतकरी जगू नरळे, लाकूड व्यापारी बिराप्पा कोंडीबा ऐडवे, ट्रॅक्टर मालक दिगंबर बिराप्पा ऐडवे (सर्वजण रा. निंबुनी, ता. मंगळवेढा) व खरेदीदार अमोल शंकर निमग्रे (रा. जवळा, ता. सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## तहसील कार्यालय माळशिरस येथे ग्राहक मेळावा संपन्न

# नागरिकांनी सेतू कार्यालयात दरपत्रकानुसार पैसे द्यावेत - तहसीलदार

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** तहसील कार्यालय माळशिरस, अखिल भारतीय ग्राहक पंचायत माळशिरस व महाराष्ट्र ग्राहक पंचायत यांचे संयुक्त विद्यमाने आज तहसील कार्यालय माळशिरस येथे ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला होता.या वेळी बोलताना तहसीलदार सुरेश शेजुळ व नायब तहसीलदार अमोल कदम यांनी नागरिकांनी सेतू कार्यालयात दरपत्रकाप्रमाणे पैसे द्यावेत,पावती मागून घ्यावी तसेच जादा पैशाची मागणी केल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन केले. मान्यवरांचे मनोगत व्यक्त करताना माजी तालुका अध्यक्ष उपेंद्र केसकर




यांनी ग्राहक चळवळी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले, 2019 मध्ये ग्राहक कायद्यात झालेले बदल तसेच ग्राहक न्यायालयात ई दाखिल(www.eDaakhil) या पोर्टल वरून ऑनलाईन दावा कसा दाखल करावा या बद्दल माहिती दिली.दत्तात्रय थोरात, भगवान घुगरदरे यांनी ग्राहक चळवळी विषयी माहिती दिली व तालुक्यातील कामाची माहिती दिली .पुरवठा निरीक्षण अधिकारी रविकिरण शेटे यांनी आपले अनुभव सांगताना सदनिका खरेदी करताना काय काळजी घ्यावी हे सांगितले. यावेळी सर्व मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव महादेव भोसले यांनी केले.या कार्यक्रमासाठी पुरवठा विभागाचे सुशांत केमकर,रोहित बनकर,सलीम शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाची सुरुवात व सांगता चाहापानाने झाली.या वेळी ग्राहक पंचायतीचे वामनराव वाघमोडे, हारून शेख,सचिन पवार, संजय पवळ,बाळासो झंजे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## भीमा नदीचे पाणी ५ जानेवारीला औज बंधाऱ्यात पोचणार

**सोलापूर :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य स्त्रोतांपैकी औज बंधारा हा एक असून सध्या त्यात दहा दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा आहे. महापालिकेच्या पत्रानुसार सोलापूरकरांच्या पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून २६ डिसेंबर रोजी उजनी धरणातून भीमा नदीद्वारे पाणी सोडले जाणार आहे. ५ जानेवारीला ते पाणी औज बंधाऱ्यात पोचेल, असे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची यात्रा, मकर संक्राती या सण-उत्सवामुळे सोलापूर शहरासाठी पाणी लागणार आहे. सोलापूर ते उजनी या समांतर जलवाहिनीचे काम देखील अजून पूर्ण झाले नाही. त्यासाठी आणखी काही दिवसांची वाट पाहावी लागणार असून तीन महिने त्या पाइपलाइनचे प्रात्यक्षिक होणार आहे. त्यामुळे औज बंधाऱ्यातील पाणी सोलापूर शहरासाठी महत्त्वाचे असणार आहे. त्यामुळे आता उजनीतून औज बंधाऱ्यात पाणी सोडले जाणार असून साधारणतः १५ दिवसांत ते त्याठिकाणी पोचेल. या आवर्तनासाठी उजनीतील सहा टीएमसी पाणी संपणार आहे.

## प्रा. वैभव अनिल ऐदाळे यांना पी. एच. डी. पदवी प्रदान



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूरचे सुपुत्र तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी माजी आमदार जिवाप्पा ऐदाळे यांचे पणतू असणारे प्रा. वैभव अनिल ऐदाळे यांना नुकतेच पीएचडी पदवी बहाल करण्यात आली. सध्या ते एस.पी. जैन कॉलेज राजगुरुनगर पुणे येथे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना डॉ. अर्जुन मासाळ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राथमिक शिक्षण गौतम विद्यालय पंढरपूर तर महाविद्यालयीन शिक्षण उमा महाविद्यालय पंढरपूर व पदव्योत्तर शिक्षण मॉडर्न कॉलेज पुणे येथे झाले.

» पान १ वरुन

## निरंतर नि:शुल्क ऊर्जा

कार्यक्रमात सहभाग घेतला. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सौर कृषी प्रकल्पांचे उद्‌घाटन करण्यात आले. दरम्यान, सरकारच्या या उपक्रमाकडे गेम चेंजर म्हणून पाहिले जात आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सौरऊर्जेचा वापर करण्यात अग्रेसर बनवण्याच्या दिशेने प्रयत्न करत असल्याचं देखील यामधून स्पष्ट होत आहे. या योजनेच्या आधी महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सौरऊर्जेचा वापर करण्यात अग्रेसर बनवण्याच्या दिशेने प्रयत्न करत आहे.


## रशियाला जाणारे विमान कोसळले !

मिडियावर व्हायरल झाला आहे. विमानात तांत्रिक बिघाड झाल्यावर वैमानिकाने इमर्जन्सी लँडींगसाठी सूचना केली होती. मात्र, हे विमान थेट खाली कोसळले व मोठा स्फोट झाला. या विमानात १०० पेक्षा अधिक प्रवासी प्रवास करत होते. त्यांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. ख्रिसमस सणादिवशीच हा अपघात झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अजरबाईजन एरलाईनचं हे विमान असल्याची माहिती आहे. या दुर्घटनेत सहा प्रवासी जिवंत असल्याची पुष्टी झाली आहे, तर अनेक प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. कझाकस्तान सरकारने दिलेल्या माहितीनुसार, ॲक्टाऊ विमानतळाजवळ हा अपघात झाला. हे विमान अझरबैजान एअरलाइन्सचे होते. हे विमान रशियातील ग्रोझनी येथे जात होता. ग्रोझनीमध्ये दाट धुक्यामुळे या विमानाला मार्ग वळविण्यास सांगण्यात आले होते.

## मंगळुरूसाठी विमानसेवा सुरु करण्याची...

आता पुण्यातून सिंगापूर, दुबई आणि बँकॉकसाठी थेट आंतरराष्ट्रीय विमानसेवेत आणखी वाढ झाली आहे. इंडिगेची पुण्यातून दुबईसाठी दररोज विमानसेवा सुरू आहे. हे विमान पुण्यातून सायंकाळी ५.४० वाजता निघून दुबईला रात्री १०.१० वाजता पोहोचते. दुबईतून हे विमान रात्री १२.१५ मिनिटांनी सुटते. इंडिगोची पुण्यातून बँकॉकसाठी आठवड्यातून तीन दिवस बुधवारी, शुक्रवारी आणि शनिवारी थेट विमानसेवा सुरू आहे. हे विमान पुण्यातून रात्री ११.१० वाजता सुटते आणि ते बँकॉकवरून रात्री १ वाजून १५ मिनिटांनी सुटते. पुण्यातून आधी स्पाईसजेटकडून सिंगापूर आणि एअर इंडियाकडून (आधीची विस्तारा) दुबईसाठी थेट विमानसेवा सुरू होती. त्यात दुबईसाठी आणखी एक आणि बँकॉकसाठी दोन विमानांची भर पडली आहे. यामुळे पुणे तीन आंतरराष्ट्रीय ठिकाणांशी हवाई मार्गाने थेट जोडले गेले आहे. याचवेळी पुणे विमानतळावरील आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या पाचवर पोहोचली आहे.

## वाघाचा मुक्काम येडशी घाटातच



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** गेल्या आठवडाभरापासून धाराशिव-सोलापूर सीमेवरील ढेंबरेवाडी (ता. बार्शी) परिसरात वाघ ठाण मांडून बसलेला आहे. मंगळवारी (ता. २४) सायंकाळी पाच वाजता पुन्हा वन विभागाने लावलेल्या कॅमेऱ्यात हा वाघ कैद झाला आहे. त्यामुळे त्याचा येडशी घाटातील मुक्काम वाढला आहे. विशेष म्हणजे पाच दिवसांपूर्वी आढळलेल्या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर त्याचे पुन्हा दर्शन झाल्याने त्याचा वावर एकाच ठिकाणी असल्याचेही स्पष्ट झाले आहे. गेल्या ८ ते १० दिवस झाले बार्शी तालुक्यात वाघाने नागरिकांची झोप उडवली आहे. वनाधिकारी आपल्या सहकाऱ्यांसह वाघास जेरबंद करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत

## जयंती साजरी

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** भारतीय राजकारणातील सुशासनाचे प्रणेते भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त भाजपा शहर जिल्हा कार्यालय, सोलापूर येथे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, रोहिणी तडवळकर, लक्ष्मण गायकवाड, नागेश गंजी, प्रशांत फत्तेपूरकर, श्रीधर गोखले, सुधाकर नराल, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, बाशाभाई शेख, सावित्री पलाटी, रामचंद्र तडवळकर, सुनिल टोणपे भाजपा सोलापूर शहर पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## Selected

## मानधनच्या मागणीसाठी दिव्यांगांचा मोर्चा



**माढा :** माढा मानधन व प्रमाणपत्राच्या मागणीसाठी दिव्यांगांनी माढा तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढला. तहसीलदार विनोद रणवीरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार पांडुरंग भडकवाड, नायब तहसीलदार विजय कवडे उपस्थित होते. दिव्यांगांचे मानधन सहा हजार रुपये करावे, नियमानुसार शिधावाटप करावे, कॅम्पमधील दिव्यांगांना तत्काळ प्रमाणपत्रांचे वाटप करावे, दिव्यांगांच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## घरोघरी जाऊन क्षयरुग्णांची शोध मोहिम



**सोलापूर :** फुफ्फुसाचा क्षयरोग जडलेले अनेक रुग्ण त्रासाकडे दुर्लक्ष करून उपचार घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार २३ डिसेंबरपासून विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत ३ जानेवारीपर्यंत शहरातील आशाताई घरोघरी जाऊन एक लाख २१ हजार ६९६ क्षयरुग्णांचा शोध घेणार आहेत.

## शेतकऱ्यांचे १२ कोटी रुपयांचे अनुदान रखडले

**सांगोला :** सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांचे सुमारे १२ कोटी २२ लाख रुपयांचे अनुदान रखडले आहे. मागील तीन वर्षांपासून कृषी विभागाच्या विविध योजनांतर्गतचे हे अनुदान आहे. पात्र लाभार्थ्यांना प्रलंबित अनुदान कधी मिळणार, हा प्रश्न उपस्थित राहिला आहे. यांत्रिकीकरण, शेततळ्यासाठी मल्चिंग पेपर, कांदा चाळ, सूक्ष्म सिंचन, उपाभियान, एकात्मिक फलोत्पादन अभियान, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड अशा विविध आठ योजनांचे शेतकऱ्यांचे एकूण सुमारे १२ कोटी २२ लाख रुपयांचे अनुदान प्रलंबित आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकोना या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही भीमराव नामदेव इंगळे यांची मालकी हक्क वहिवाटीची होती. सदर मिळकत हि विद्यमान मालक भारत भिमराव इंगळे यांचे नावावर ते भिमराव नामदेव इंगळे यांचे वारस म्हणून आलेली आहे व त्यांनी सदर मिळकत ही पिरामल कॅपिटल अड हाउसिंग फायनान्स शाखा-पंढरपूर यांचे कडे कर्ज मागणी केलेली आहे आणि त्या करीता सदर मिळकत ही तारण गहाण म्हणून ठेवून घेवून आमचे कंपनीने कर्ज देण्याची तयारी दर्शवली आहे. सदर परिशिष्टात नमूद केली मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असलेचा भरवसा सदरील विद्यमान वहिवाटदार मालक यांनी आमचे अशील कंपनीस दिलेला आहे. तरी सदरील मिळकती मध्ये कोणाचाही, कसलाही प्रकारचा मालकी हक्क, वारस हक्क, हितसंबध, गहाण, दान, लीज, लीन, भाडे पट्टा, मुखत्यार पोटगी, खंड, नोकरनामा, अदला बदल दस्त, करारनामा, बक्षिसपत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार असल्यास त्यांनी त्या बाचतीत खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसाचे आत सर्व संबधित कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहोच घ्यावी. सदरील मुदतीत कोणताही हरकत न आलेस सदर मिळकत ही निर्वेध, निजोखामी व बोजाविरहित असल्याचे आणि त्या कोणाचा हक्क हितसंबध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहीत धरून आमचे अशील कंपनी सदर मिळकत कर्ज प्रकरणाकरीता तारण म्हणून गहाणखताचा दस्त पूर्ण करतील व तद्नंतर आलेली कोणाचीही, कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. मिळकतीचे वर्णनः डी. सोलापूर. सब.डी. व ता. माढा पैकी मौजे ढवळस येथील मिळकत ग्रा. पंचायत मालमता क्र.५०१ क्षेत्र १०८९ चौ. फुट (खुली व बांधीव )

पूर्व :- नागनाथ इंगळे यांचे घर
दक्षिण :- संजय राजुरे यांचे घर
पश्चिम :- गणपत दबडे यांची खुली जागा.
उत्तर:- गणेश राजुरे यांची जागा.
(येणेप्रमाणे मिळकत आतील दगड, माती, झाड, झुडूप व तदंगभूत वस्तू हक्कासह)
ता.२५/१२/२०२४

सही/-
अशिलातर्फे ॲड. रणजित एन. शिंदे
R.NO.MAH/3995/2012
पंढरपूर

### दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर (मार्केट यार्ड शाखा) नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार जयावती रविंद्रकुमार फडे रा. पंढरपूर या नावावर सेव्हिंग ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांची मुलगा अर्जदार रत्नशेखर रविंद्रकुमार फडे यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या सेव्हिंग ठेव खात्यास अर्जदार रत्नशेखर रविंद्रकुमार फडे यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

पंढरपूर
तारीख - २४/१२/२०२३

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर
( मार्केट यार्ड शाखा)

### दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर (मार्केट यार्ड शाखा) नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार दिपक तुकाराम खांडेकर रा. पंढरपूर या नावावर अल्पबचत ठेव, सेव्हिंग ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांची पत्नी अर्जदार संध्या दिपक खांडेकर यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या,अल्पबचत ठेव, सेव्हिंग ठेव खात्यास अर्जदार संध्या दिपक खांडेकर यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

पंढरपूर
तारीख - २४/१२/२०२३

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर
( मार्केट यार्ड शाखा)




### Public notice

**Notice is** hereby given that one **Mr.Bharat Bhimrav Ingale** (herein after referred to as the said mortgage) have agreed to create mortgage in respected of the G.P.property more particularly described in the schedule hereunder in favor of my/our clinent s, Piramal capital and housing finance ltd br. Pandharpur, Dist. Solapur in respect of the property described herein. That the said property came in the name of **Mr.Bharat Bhimrav Ingale heir of Bhimrav Namdev Ingale.** So I have given this notice to all persons having any claim aginst or in respect the said plot property more particularly described in the schedule hereunder or any part there of by way of sale, exchange, mortgage (Equitable or registered or otherwise) Gift, truts, inheritance, family arragement, maintains, bequest partnership, possession, lease sublease tenancy, license, line charge, pledge, easement or otherwise are hereby requested to notify hte same in writing to me/us with supporting documentary evidence at the address mentioned herein below within 14 days from the date hreof, failing whice the claim or claims, if any of such person's or person's will be considered to have been waived and or abandoned and my clinent shall proceed with disbursement of loan and creation of mortgage in respect of thereof.

**DESCRIPTION OF THE PROPERTY**

G.P.Malmatta no.501 area 1089 sq feet (open and built up) Which is situated at village Dhavlas Tal. Madha Dist.Solapur
East:- House of Nagnath Ingale.
South:- House of Sanjay rajure
West:- open land of Ganpat Dabade
North-House of Ganesh Rajure.
Dt.25/12/2024

Adv. Ranjeet N Shinde
R.NO.MAH/3995/2012
(Panel advocate)
PANDHARPUR

### महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता**
**नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्रं. २, वैजापूर**
**मुख्यालय-छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**
**(श्री गजानन महाराज मंदिराजवळ, कडाभवन समोर, गारखेडा रोड, मुख्यालय छत्रपतीसंभाजीनगर)**

### जाहीरात

**Email :- eenmcdn2abad@gmail.com** **दूरध्वनी क्रमांक :- 0240-2983020**

कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्रं.२, वैजापूर, मुख्यालय-छत्रपती संभाजीनगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे कार्यालय **Providing, Supplying, Erecting & Commissioning of Surge Protection System for Life Irrigation Scheme No. 3, Stage 1, Part 1 to 3 under Krishna Marathwada Irrigation Project. Dist. Beed. ( कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, जि. बीड अंतर्गत उपसा सिंचन योजना क्र. ३ मधील टप्पा क्र. १ मधील भाग- १ ते ३ यांकरिता प्रतिजलाघात यंत्रणेचे ( Surge Protection System) काम करणेबाबत )** दर मागणी पत्रक मागवित आहेत. सदरचे दर मागणी पत्रक hppts :wrd.maharashtra.gov.in शासनाचे या संकेतस्थळ येथून डाऊनलोड करता येईल.

दिनांक २६/१२/२०२४ पासून ते दिनांक ०२/०१/२०२५ पर्यंत सदर दरपत्रक या कार्यालयास सादर करावेत. दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.२, वैजापूर, मुख्यालय- छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

अट असलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

(दर मागणी पत्रकामध्ये काही बदल होत असल्यास शासनाच्या वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)

सही/-
(कृ. ए. घुगे)
कार्यकारी अभियंता
नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.२,
वैजापूर, मुख्यालय-छत्रपती संभाजीनगर

# आता गुऱ्हाळ पालकमंत्रीपदाचे

महायुतीला विधानसभा निवडणुकीत राक्षसी बहुमत मिळाले. युती सरकारची स्थापना होऊन महिना उलटला. आता जनतेच्या कल्याणकारी योजना मार्गी लागणार अशा आशा निर्माण झाल्या; परंतु कसचे काय! जनतेचे कल्याण राहिले बाजूला उलट मुख्यमंत्रिपद ते मंत्र्यांचे खातेवाटप यात विविध क्रीडा प्रकार सुरू झाले. प्रथम मुख्यमंत्रिपदाचा घोळ झाला नंतर मंत्रिमंडळाचा पायघोळ सुरू झाला. अखेर मंत्रिमंडळाची रचना झाली. ती होताना कबड्डी, खो-खो, सूरपारंब्या, नुरा कुस्ती आदींचे दर्शन घडले. क्षणभर मंत्रिमंडळाचे ऑलिम्पिकच सुरू झाले की काय, असे वाटले. मंत्रिमंडळाचे खातेवाटप करताना महायुतीतील घटक पक्षांत घमासान झाले. रुसवे फुगवे कसे असतात ते दिसले. एकदाचे खातेवाटप झाले. आता पालकमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. मुंबईसाठी भाजप व शिंदे गटाने दावा केला आहे आणि आगामी पालिका निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून महिना झाला तरी राज्यातील महायुती सरकार अद्याप स्थिरसावर झालेले नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जाहीर झाले, मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. खातेवाटपाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर आता जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदासाठी शिंदे गट व भाजपकडून जोरदार दावा केला जात आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे म्हणून इच्छुकांकडून पक्षश्रेष्ठींकडे फिल्डिंग लावली जात आहे. आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन भाजप व शिंदेंच्या शिवसेनेकडे मुंबई शहर व उपनगराचे पालकमंत्रिपद जाईल, असे सांगण्यात येते मात्र, भाजपचे मंत्री आशिष शेलार यांना मुंबई शहराचे पालकमंत्रिपद हवे आहे तर मुंबई उपनगराचे पालकमंत्रिपद मिळावे म्हणून मंगलप्रभात लोढा, नितेश राणे, उदय सामंत इच्छुक आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार बराच रखडला. मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू झाले तरी खातेवाटप झाले नाही. अखेर अधिवेशन संपल्यानंतर खातेवाटप जाहीर झाले. आता पालकमंत्रिपद मिळावे यासाठी भाजप, शिंदेंची शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील मंत्र्यांचे पक्षश्रेष्ठींकडे लॉबिंग सुरू आहे. अनेक मंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदासाठी फिल्डिंग लावली आहे. महायुतीत पालकमंत्रिपदावरून जोरदार रस्सीखेच सुरू आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर मंत्री भरत गोगावले यांनी दावा केला आहे तर अदिती तटकरे यांनीही या पदासाठी दावा केला आहे. बीडचे पालकमंत्रिपद धनंजय मुंडे यांना मिळणार की पंकजा मुंडे यांना, याकडे सा-यांचे लक्ष लागले आहे. संभाजीनगरमध्ये संजय शिरसाट की अतुल सावे याबाबत उत्सुकता आहे. रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक, पुणे, मुंबईच्या पालकमंत्रिपदासाठी अनेक दावेदार आहेत. यामुळे आमच्यात पालकमंत्रिपदावरून समन्वय आहे, मतभेद नाहीत, असे महायुतीचे नेते कितीही सांगत असले तरी या पदावरून वाद होत आहेत हे उघड झाले आहेत. ३५ जिल्हे आणि ४१ मंत्री असल्याने पालकमंत्रिपदाचे वाटप अवघड बनले आहे. अनेक जिल्ह्यांना एकाहून अधिक मंत्रिपदे मिळाल्याने तिथे पालकमंत्रिपदाचा पेच निर्माण झाला आहे. महायुती सरकारमधील खातेवाटपातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाराजी स्पष्ट दिसते आहे. निवडणुकीचे निकाल जाहीर झाले तेव्हा एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदावर आपलीच फेरनिवड होईल, असे वाटले होते. या पदासाठी ते अक्षरश: रुसून बसले होते. आपली फेरनिवड व्हावी यासाठी त्यांनी दबावाचे राजकारण सुरू केले. काळजीवाहू मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे होते; परंतु ते आपल्या दरे गावी निघून गेले. त्या वेळी शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले होते की, काही महत्त्वाचे निर्णय घ्यायची वेळ आली की, एकनाथ शिंदे आपल्या गावी जातात. शिंदे गावी गेले आणि आजारी पडले. काळजीवाहू मुख्यमंत्र्यांची काळजी घेण्याची वेळ राज्यावर आली; परंतु एकनाथ शिंदे यांच्या नाराजीनाट्याला यश आले नाही. मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांचीच निवड झाली तेव्हापासून शिंदे यांच्या नाराज चेह-यावर आजवर हास्य फुलले नाही. मुख्यमंत्रिपद गेले तरी किमान गृहमंत्रिपद तरी मिळेल, अशी आशा होती; परंतु तीही फोल ठरली तेव्हा शिंदे यांचा नाराज चेहरा आणखी काळवंडला. आता पालकमंत्रिपद वाटपाच्या निमित्ताने तो आणखी काळाठिक्कर पडला आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांना नगर विकास, गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम विभाग ही खाती मिळाली आहेत. आपल्या अनेक मंत्र्यांना महत्त्वाची खाती न मिळाल्याने त्यांना शिंदे यांनी 'श्रद्धा व सबुरी'चा सल्ला दिला आणि स्वत: मात्र अचानक दरे गावी निघून गेले. खातेवाटप झाल्यानंतर आणि हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर नवे मंत्री आपापल्या मतदारसंघात परतले आहेत. तेथे त्यांचे सत्कार समारंभ सुरू आहेत. मंत्रिपदाची शर्यत संपल्यानंतर त्यांची पालकमंत्रिपदासाठी स्पर्धा सुरू आहे. जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवण्यासाठी पालकमंत्रिपद महत्त्वाचे ठरते. विशेषत: जिल्हा नियोजन समितीकडील निधीचे वाटप पालकमंत्र्यांच्या अधिकारात होते तसेच प्रशासकीय व पोलिस यंत्रणाही हाताखाली राहते. त्यासाठी प्रत्येक मंत्र्याला आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे, अशी आशा असते. यामुळे खातेवाटप जाहीर होताच पालकमंत्री होण्यासाठी स्पर्धा सुरू होते. सध्याच्या मंत्रिमंडळात १६ जिल्ह्यांना प्रतिनिधीत्व मिळालेले नाही त्यामुळे एकापेक्षा अधिक मंत्रिपदे असलेल्या जिल्ह्यातील नेत्यांना बाहेरच्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद भूषविण्याची संधी मिळू शकते. मंत्रिमंडळात २ उपमुख्यमंत्र्यांसह ३५ कॅबिनेट मंत्री असल्याने राज्यमंत्र्यांना फार संधी मिळू शकेल, असे वाटत नाही. मंत्रालयातील दालनांवरूनही रुसवे-फुगवे सुरू झाले आहेत. पालकमंत्रिपदाच्या ऑलिम्पिकमध्ये कोणाला यश मिळते ते बघायचे!

> मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या विद्यमान केंद्र सरकारने हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये देशाला उत्पादनक्षेत्रात स्वयंपूर्ण बनवण्याबरोबरच निर्यातप्रधान देश बनवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. यामध्ये संरक्षणक्षेत्राचे वाढते योगदान हे उल्लेखनीयच नव्हे तर प्रशंसनीय ठरणारे आहे. आशिया खंडातील शस्त्रास्त्रांचा सर्वांत मोठा आयातदार देश अशी ओळख असणारा भारत आज जवळपास १०० देशांना संरक्षणसाधन सामग्रीची आणि शस्त्रास्त्रांची निर्यात करणारा महत्त्वाचा देश बनून पुढे आला आहे. इराणचा शेजारी असणारा आर्मेनिया हा भारताचा सर्वात मोठा खरेदीदार बनला आहे. याखेरीज अमेरिका, फ्रान्स, ब्राझील, युएईसह अनेक देशांना भारताची संरक्षणनिर्यात वाढत आहे.

# संरक्षण निर्यातीची 'लायन लीप'

दहा वर्षांपूर्वी केंद्रातील मोदी सरकारने हाती घेतलेल्या मेक इन इंडिया या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत संरक्षण क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीसाठीची मर्यादा वाढवण्याबरोबरच, आशिया खंडातील शस्त्रास्त्रांचा सर्वांत मोठा आयातदार ही भारताची ओळख पुसून टाकून संरक्षण साधनसामग्रीच्या व्यापारातील निर्यातदार देश बनण्याचा संकल्प केला होता. आज दहा वर्षांनंतरची स्थिती पाहिल्यास केंद्र सरकारच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे भारताची संरक्षण निर्यात झपाट्याने वाढत आहे. भारताने लष्करी उपकरणांच्या विक्रीचा २१ हजार कोटी रुपयांचा आकडा पार केला आहे. विशेष म्हणजे इराणचा शेजारी असणारा आर्मेनिया हा त्याचा सर्वात मोठा खरेदीदार बनला आहे. आर्मेनियाने भारताकडून आकाश क्षेपणास्त्रे आणि पिनाका रॉकेट्स यांसारखी प्रगत शस्त्र प्रणाली खरेदी केली आहे. या बदललेल्या ट्रेंडमुळे संरक्षण क्षेत्रातील भारताची स्थिती बदलत आहे. इकॉनॉमिक टाइम्सच्या अहवालानुसार, भारताने आपल्या संरक्षण निर्यात धोरणात मोठे बदल केले आहेत. पूर्वी भारत प्राणघातक शस्त्रास्त्रांची निर्यात करणे टाळत होता; पण आता ही अट भारताने काढून टाकली आहे. यामुळेच आर्मेनिया संरक्षण उत्पादनांचा सर्वात मोठा खरेदीदार बनू शकला. आकाश आणि पिनाका व्यतिरिक्त आर्मेनियाने भारताकडून १५५ मिमीच्या तोफांची खरेदी केली आहे. भारतात विकसित करण्यात आलेली आकाश एअर डिफेन्स मिसाईल्स सिस्टीम घेणारा आर्मेनिया हा पहिला देश ठरलेला आहे. या यंत्रणेद्वारे २५ किलोमीटर परिघात आलेल्या क्षेपणास्त्राच्या मार्गात हस्तक्षेप करता येतो. या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की २०२३-२४ या आर्थिक वर्षात या तीन देशांना भारताच्या लष्करी उपकरणांची विक्री २१,०८३ कोटी रुपयांवर (२.६ अब्ज) पोहोचली आहे.

भारतीय सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी कंपन्या सुमारे १०० देशांना विविध प्रकारची शस्त्रे आणि दारूगोळा पुरवत आहेत. यामध्ये ब्रह्मोस, डॉर्नियर २२८ विमाने, रडार आणि चिलखती वाहनांचाही समावेश आहे. बोईंग आणि लॉकहीड मार्टिन सारख्या कंपन्याही भारताकडून विमाने आणि हेलिकॉप्टरचे सुटे भाग खरेदी करत आहेत. टाटा बोईंग एरोस्पेस देखील यामध्ये योगदान देत आहे. फ्रान्सही भारताकडून सॉफ्टवेअर आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूही खरेदी करत आहे. आर्मेनियाने भारताकडून रडार, बुलेट प्रूफ जॅकेट आणि नाईट व्हिजन गॉगल्स खरेदी करण्याचा करारही केला आहे. अझरबैजानबरोबरच्या युद्धादरम्यान, आर्मेनियाने आपली बहुतांश खरेदी भारताकडून केली होती, हे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवे. याचे कारणही तसेच होते. अझरबैजानला तुर्किये आणि पाकिस्तानचा पाठिंबा आहे. त्यामुळे आर्मेनियाने भारताला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. त्यापाठोपाठ आता ब्राझीलही भारताकडून संरक्षण वस्तू खरेदी करण्यास उत्सुक आहे. ब्राझीलनेही वेपन सिस्टीमच्या अत्याधुनिकीकरणासाठी भारताबरोबर सह उत्पादन आणि सहविकासाची तयारी दाखवलेली आहे. याशिवाय फिलीपिन्स आणि अनेक आखाती देशही या संदर्भात भारताच्या संपर्कात आहेत. या देशांना प्रामुख्याने ब्राह्मोस क्षेपणास्त्रे हवी आहेत. ही क्षेपणास्त्रे भारताने रशियाबरोबर विकसित केलेली आहेत. संरक्षण उत्पादनासाठी भारत सरकारने ३ लाख कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापैकी २०२३-२४ या आर्थिक वर्षातच १.२ लाख कोटी रुपयांचे उत्पादन झाले आहे. भारतात १६ सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, ४३० परवानाधारक कंपन्या आणि सुमारे १,६०० एमएसएमई संरक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे भारतातून अमेरिका, फ्रान्स आणि आर्मेनिया तीन देशांमध्ये सर्वाधिक संरक्षण साहित्याची निर्यात होते. भारतातील सरकारी मालकीच्या आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यांनी विविध प्रकारची शस्त्रास्त्रे जवळपास १०० देशांमध्ये निर्यात केलेली आहेत. अमेरिकेला निर्यात करण्यात येणाऱ्या संरक्षण साहित्यामध्ये विमान आणि हेलिकॉप्टरच्या सुट्या भागांचा समावेश आहे. मिसाईल, तोफा, शस्त्रे टिपणारी रडार रॉकेट सिस्टीम, नाईट विजन इक्विपमेंट या गोष्टींसाठी आर्मेनियाने भारताबरोबर चार वर्षांचा करार केलेला आहे.

आता तो दिवस दूर नाही जेव्हा भारताचे नाव जगातील अव्वल संरक्षण निर्यात करणाऱ्या देशांमध्ये समाविष्ट होईल. सध्या अमेरिका, रशिया, फ्रान्स, चीन आणि जर्मनी हे पाच देश आहेत जे जगातील एकूण शस्त्रास्त्रांच्या निर्यातीपैकी ७६% पुरवठा करतात. २०१८ ते २०२२ दरम्यान, अमेरिका सर्वात मोठा निर्यातदार राहिला, त्यानंतर रशिया आणि फ्रान्सचा क्रमांक लागतो. हे आकडे जागतिक सुरक्षा आणि शस्त्रास्त्र व्यापारात या देशांची भूमिका दर्शवतात. भारताचे नाव पहिल्या १० मध्ये नाही, परंतु संरक्षण निर्यातीशी संबंधित

**ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त)**

आकडेवारीवरून असे दिसून येते की भारताने या क्षेत्रात अभूतपूर्व यश मिळवले आहे आणि जर सर्व काही सुरळीत झाले तर लवकरच भारताचे नाव देखील या यादीत समाविष्ट केले जाईल.

संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, चालू वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत संरक्षण उपकरणे आणि संरक्षण संबंधित वस्तूंच्या निर्यातीत ७७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. संरक्षण क्षेत्रातील 'आत्मनिर्भर भारता'प्रती देशाची वचनबद्धता संरक्षण उत्पादनात जागतिक नेतृत्वाकडे घेऊन जात असल्याचे मंत्रालयाचे म्हणणे आहे. २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीत देशाची संरक्षण निर्यात ११,२३३ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे अधिकृत आकडेवारी दर्शवते. गेल्या वर्षी याच कालावधीत भारताची संरक्षण निर्यात केवळ ६,३४२ कोटी रुपयांची होती. गेल्या १० वर्षांच्या कामगिरीवर नजर टाकली तर एका दशकात देशाच्या संरक्षण निर्यातीत जवळपास १० पट वाढ झाली आहे. दहा वर्षांपूर्वी २०१४-१५ मध्ये केवळ १,९४१ कोटी रुपयांच्या संरक्षण उपकरणांची निर्यात झाली होती. देशातील संरक्षण उत्पादनात विक्रमी वाढ होऊन १,२६,८८७ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राला भारताचे ब्रह्मास्त्र म्हटले जाते. जगातील अनेक देश ते घेण्यास उत्सुक आहेत. दक्षिण आफ्रिका, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, इंडोनेशिया, व्हिएतनाम आणि इजिप्त हे देशही हे क्षेपणास्त्र घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

संरक्षण निर्यातीला चालना देण्यासाठी, सरकारने गेल्या १० वर्षांत अनेक धोरणात्मक पुढाकार घेतले आहेत. विशेषतः निर्यात प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे आणि एंड-टू-एंड ऑनलाइन निर्यात उद्योगानुकूल बनवण्यात आली आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांना व्यवसाय करणे सोपे झाले आहे. याशिवाय, आत्मनिर्भर भारत उपक्रमाने देशात स्वदेशी डिझाइन, विकास आणि संरक्षण उपकरणांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यात आले आहे. संरक्षण साहित्यसामग्रीच्या क्षेत्रात लार्सन अँड टुब्रो, टाटा अॅडव्हान्स सिस्टीम्स आणि भारत फोर्जसारख्या खासगी क्षेत्रातील कंपन्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र या दोघांनी संरक्षण उत्पादनातील वाढीसाठी सुरू केलेले प्रयत्न गेमचेंजर ठरणारे आहेत.

अलीकडील काळात जागतिक पातळीवर अस्थिरता आणि असुरक्षितता कमालीची वाढली आहे. रशिया-युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध आणि इस्रायल-हमास यांच्यातील लढाई यामुळे अनेक देशांना आपले सामरीक सामर्थ्य वाढवायचे आहे. यासाठी ते भारताकडून शस्त्रास्त्रे खरेदी करत आहेत, ही बाब अनेकार्थांनी महत्त्वाची आहे.

भारत ऑस्ट्रेलिया, जपान, इस्रायल आणि ब्राझीलसह ३४ देशांना बुलेटप्रूफ जॅकेट पुरवतो. संयुक्त अरब अमिराती, इजिप्त, इंडोनेशिया, थायलंडसह सुमारे १० देशांनी भारताकडून दारूगोळा खरेदी केला आहे. मॉरिशस, सेशेल्स आणि मालदीव या देशांनी भारताकडून जलद हल्ला करणारी जहाजे खरेदी केली आहेत. संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेनंतर इस्रायल भारताकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे खरेदी करतो. यामध्ये बुलेटप्रूफ जॅकेट, हेल्मेट, बंदुकीचे भाग, बॅटरी आणि शस्त्रांचे छोटे भाग यांचा समावेश आहे. अनेक भारतीय कंपन्या इस्रायलला शस्त्रे विकतात. इस्रायल या कंपन्यांकडून वस्तू विकत घेतो आणि आपल्या सैन्यासाठी वापरतो. अमेरिका ही जागतिक महासत्ता आहे आणि ती आपल्या संरक्षण गरजा पूर्ण करण्यासाठी जगभरातील अनेक देशांकडून शस्त्रे आणि त्यांचे भाग आयात करते. भारताची वाढती औद्योगिक क्षमता आणि अमेरिकेशी मजबूत धोरणात्मक संबंध यामुळे भारत शस्त्रास्त्रांच्या क्षेत्रात अमेरिकेसाठी महत्त्वाचा पुरवठादार म्हणून उदयास आला आहे. पण तो एकमेव देश नाही. इतर अनेक देशही अमेरिकेला शस्त्रास्त्रांचे सुटे भाग पुरवतात. याशिवाय ब्रिटनही भारतीय कंपन्यांसाठीचा मोठा खरेदीदार आहे. या कंपन्यांच्या उत्पादनांमध्ये बुलेटप्रूफ जॅकेट, हेल्मेट, इलेक्ट्रॉनिक्स आणि अभियांत्रिकी सेवा यांचा समावेश आहे. संरक्षणक्षेत्रातील निर्यात ही भारताच्या अर्थकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. याचे कारण यातून मिळणारे परकीय चलन आणि या क्षेत्रातील उद्योगधंद्यांमध्ये होणारी रोजगारनिर्मिती असे दुहेरी लाभ भारताला या निर्यातवृद्धीमुळे होताहेत. सध्याची एकंदर जागतिक परिस्थिती पाहता येणाऱ्या काळात भारत संरक्षण निर्यातीच्या क्षेत्रातील आपले निर्यातीचे उद्दिष्ट लवकरच पूर्ण करेल असे दिसते. भारताच्या 'ग्रोथ स्टोरी'मध्ये संरक्षण निर्यातीला वेगळे महत्त्व असून 'विकसित भारता'च्या उद्दिष्टपूर्तीमध्ये हा एक नवा अध्याय लिहिला जात आहे.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** गुरुवार, दिनांक २६ डिसेंबर २०२४. मार्गशीर्ष कृ. ११, स्वाती, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, उत्तरायण, हेमंत ऋतू. सफला एकादशी. **नक्षत्र :** स्वाती, योग : सुकर्मा, करण : बव. **सूर्योदय** : स.०६.५१ सूर्यास्त : सायं.०५.३८ वा.
**राहू काळ : दुपारी : १:३० ते ३:००**

**दिनविशेष**

▶१९१४ : ज्येष्ठ समाजसेवक, खंदे श्रमजीवी कार्यकर्ते, झुंजार नेते, कुष्ठरोग्यांना एका आदर्श सामाजिक, औद्योगिक व कृषी वसाहतीत बसवणारे 'आनंदवनाचे' जनक, निर्भिड साहित्यिक, कवी, अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचे मानकरी मुरलीधर देविदास उर्फ बाबा आमटे यांचा जन्म. ▶ १९१७ : साहित्यिक डॉ. प्रभाकर माचवे यांचा जन्म. त्यांनी हिंदी, इंग्रजी व मराठीत शंभराहून अधिक ग्रंथ लिहिले, निर्गुणी काव्याचे तुलनात्मक अध्ययन हा त्यांच्या डॉक्टरेच्या प्रबंधाचा विषय होता. ▶१९८९ : विख्यात व्यंगचित्रकार के. शंकर पिल्ले यांचे निधन. ▶१९९८ : पठ्ठे बापुराव प्रतिष्ठान आणि सांस्कृतिक कला मंडळाच्या वतीने ज्येष्ठ लावणी गायिका सरस्वतीबाई कोल्हापूरकर यांना पठ्ठे बापुराव पुरस्कार प्रदान. ▶१९९९ : नेहरूंच्या जमान्यातील काँग्रेस नेते व माजी राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा यांचे निधन. ▶२००० : जुन्या पिढीतील प्रसिद्ध नाटककार आणि साहित्यिक प्रा. शंकर गोविंद साठे यांचे निधन.

**राशीभविष्य**

▲**मेष** : गुप्त शत्रूंपासून सावध रहा. ▲**वृषभ** : कामात दिरंगाई होईल. ▲**मिथुन** : जिवलग साथीदार भेटतील. ▲**कर्क** : आनंददायक दिवस. ▲**सिंह** : घरगुती समारंभ आखाल. ▲**कन्या** : गृहसौख्य लाभेल. ▲**तुळ** : वाटाघाटी कराल. ▲**वृश्चिक** : अर्धवट कामे पूर्ण होतील. ▲**धनु** : मेजवानीचा योग ▲**मकर** : धनलाभ होईल. ▲**कुंभ** : सार्वजनिक कामे कराल. ▲**मीन** : मनाप्रमाणे कामे होतील.

**चिंतन**

ज्याप्रमाणे कडुनिंबाच्या झाडाला दूध, तूप घालूनही गोडपणा येत नाही. त्याप्रमाणे अनेक प्रकारचा उपदेश करुनही दुर्जन सज्जन बनत नाहीत, सापाच्या दातात, माशीच्या डोक्यात आणि विंचवाच्या शेपटीत विष असते; परंतु दुर्जनांच्या अंगोपंगात विषय असते.

– आर्य चाणक्य

**व्यक्तीविशेष**

### बाबा आमटे

मुरलीधर देवीदास उर्फ बाबा आबटे यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी झाला. एम. ए. एल. एल. बी. असलेल्या बाबांनी आपल्या आयुष्याची वाटचाल मात्र साने गुरुजी, विनोबा आणि महात्माजींनी सांगितलेल्या कर्ममय मार्गावरुन सुरु ठेवली आहे. जीवनाच्या मांगल्याची जाणीव हाच जगातील सर्वश्रेष्ठ धर्म असे मानणाऱ्या बाबांनी भीक मागणाऱ्या कुष्ठरोग्यांची अस्मिता जागवली. दान नादान करते, काम उभारते, हा संजीवकमंत्र त्यांच्या मनात रुजविला. पांगळ्यांच्या सोबतीला, येऊ द्या बलदंड बाहूट। निर्मितीच्या मुक्त गंगा, द्या इथे मातीत वाहू... । असे म्हणत आनंदवनाची निर्मिती केली. १९४९ मध्ये उभारलेल्या या आनंदवनात त्यांनी उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये उभारली. संधिनिकेतन, मुक्तीसदन, सूर्यग्राम, सोमनाथ प्रकल्प राबविले. बाबांना अनेक पुरस्कारही लाभले. पद्मश्री, राष्ट्रभूषण, जमनालाल बजाज पारितोषिक, सामाजिक न्याय पुरस्कार यासह अनेक पुरस्कार लाभलेल्या भारत जोडो, आंदोलनाचे प्रणेते असणाऱ्या बाबांना मॅगससे पुरस्कारही लाभला.

**बोधकथा**

### दुसऱ्याच्या कामात उठाठेव करू नये

एका नगरात एक माणूस राहत होता. त्याचा व्यवसाय कपडे धुण्याचा होता. त्याच्याकडे ओझी वाहण्यासाठी एक गाढव होते आणि घराची राखण करण्यासाठी एक कुत्राही होता. एके रात्री मालक गाढ झोपला असताना घरात चोर शिरले. ते पाहून गाढव कुत्र्याला म्हणाले, 'अरे बघ आपल्या मालकाच्या घरात चोर शिरत आहे. तू मोठ्याने भुंकून मालकाला जागे का करत नाहीस?' त्यावर कुत्रा चिडून म्हणाला, 'मी काय करावे आणि काय करू नये हे मी ठरवेन. त्याबद्दल तू काही बोलायचे नाही. अरे मी रात्रंदिवस जागून मालकाच्या घराचे रक्षण करतो पण मालकाला त्याची मुळीसुद्धा किंमत नाही. तो मला व्यवस्थित खायलाही देत नाही. जावू दे त्याला माझी किंमत नाही तर होऊ दे चोरी. मी मुळीच भुंकणार नाही.' **(पूर्वार्ध)**

**जिज्ञासा**

### लंबकाद्वारे कालमापन

एकदा गॅलेलीओ नेहमीप्रमाणे प्रार्थनेसाठी प्रार्थनामंदिरात गेला होता. त्या मंदिरच्या छतावर असलेल्या झुंबरात मेणबत्ती पेटवली. तेथे जमलेले सारे लोक प्रार्थनेत तल्लीन झाले होते. पण गॅलेलीओचे लक्ष मात्र झुंबराकडे वेधलं होतं कारण मेणबत्ती पेटवताना त्या झुंबराला धक्का लागला होता आणि ते झोके घेत होते. गॅलेलीओ बघत होता की हे झुंबर अगदी नियमितपणे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत झोके घेत आहे. त्याचे ते झोके बघताना गॅलिलिओच्या मनात प्रश्न निर्माण होऊ लागले. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी या झुंबराला किती वेळ लागत असावा. हे मापन करण्यासाठी त्या वेळी मनगटी किंवा भिंतीवरचे घड्याळ नव्हते. पण हार मानेल तो गॅलेलीओ कसला? गॅलेलीओने विचार केला की आपल्या नाडीच्या ठोक्यात नियमितपणा आहे. मग त्याच्यावरच आपण वेळ मोजू. त्यानंतर गॅलेलीओने झुंबराचे एक आंदोलन पूर्ण होईपर्यंत आपल्या नाडीचे किती ठोके पडतात हे मोजून पाहिले. हे निरीक्षण करत असताना त्याला एक आश्चर्यकारक गोष्ट लक्षात आली. झुंबराच्या प्रत्येक आंदोलनाला लागणारा काळ आणि नाडीच्या ठोक्यांची संख्या प्रत्येक वेळी कायम होती. झोका लहान असो वा मोठा तो पूर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी मात्र सारखाच असतो असे त्याला निदर्शनास आले. घरी गेल्यावर त्याने एक बारीक दोरा घेऊन त्याच्या टोकाला एक छोटा दगड बांधला. दुसरं टोक खिळ्याला बांधून त्याला हलकासा झोका दिला. नंतर दोऱ्याची लांबी कमी-जास्त करून दोन्ही-तिन्ही प्रकारच्या लंबकांच्या आंदोलन करण्याच्या वेळेवर काय परिणाम होतात याचे निरीक्षण केले. अवघ्या १९ व्या वर्षी अशी तीक्ष्ण निरीक्षणशक्ती लाभलेला गॅलेलीओ खरोखरच महानच म्हणायला हवा. **(उत्तरार्ध)**

**सामान्यज्ञान**

### काळा समुद्र

युरोप व आशिया यांमधील म्हणजेच आग्नेय युरोपातील भूवेष्टित समुद्राला काळा समुद्र असे संबोधले जाते. या समुद्रास युरोप, अनातोलिया व कॉकेशसाने वेढले असून भूमध्य समुद्र, एजियन समुद्र आणि अनेक सामुद्रधुन्यांद्वारे अटलांटिक महासागराशी तो जोडला गेला आहे. तसेच बोस्फोरस सामुद्रधुनीमार्फत मार्माराच्या समुद्राशी जोडला गेला आहे. काळा समुद्र हा कर्चाच्या सामुद्रधुनीद्वारे अझोवच्या समुद्राशीही जोडला गेला आहे. या समुद्राचे क्षेत्रफळ सुमारे ४ लाख ३६ हजार वर्ग किलोमीटर इतके आहे, तर याची खोली २२०६ मीटर म्हणजेच ७२३८ फूट इतकी आहे. बुल्गेरिया, जॉर्जिया, रशिया, रोमानिया, तुर्कस्तान आणि युक्रेन यांमध्ये तयार होणाऱ्या पूर्व पश्चिमोत्तर लंबवर्तुळाकार भूभागात काळा समुद्र तयार झाला. **(क्रमश:)**

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५४१**

| | | | |
|---|---|---|---|
| | 2 | | 1 |
| | 4 | 3 | |
| | | | 4 |
| 4 | | | |

**क्रमांक ५४० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 1 | 4 | 3 |
| 3 | 4 | 1 | 2 |
| 4 | 3 | 2 | 1 |
| 1 | 2 | 3 | 4 |

**हास्यविनोद**

दोन मित्र खूप वर्षांनी भेटले. दोघांचेही लग्न झाले होते.
**पहिला मित्र** : तुझी बायको कशी आहे?
**दुसरा मित्र** : ती तर स्वर्गाची अप्सराच आहे. तुझी?
**पहिला** : माझी अजून जिवंत आहे.

---

**संता** : मी काल समाजसेवा करायला गेलो आणि तेथील लोकांनी मला बदडलं.
**बंता** : का बरं? बदडणारे लोक मूर्खच म्हणायये..!
**संता** : अरे मी स्मशानभूमीच्या गेटवर वेलकमचा बोर्ड लावायला गेलो, अन्...!

**महिलायन**

### डिझायनर पडदे

मोत्याच्या पडद्यांची किंमत सर्वसाधारणपणे ५५० ते ७५० रुपयांपर्यंत असते. कॉटन, सिंथेटिक अशा मिक्स कापडाचे मटेरियल ६० ते२५० मिटर या दराने मिळते. यामध्ये सुंदर फुलांच्या प्रिंट आयि लायनिंगचे पडदेही मिळतात. हे पडदे टिकावू असल्यामुळे मध्यमवर्गीयांची पहिली पसंती ठरतात.घराच्या शाही लूकसाठी वेलवेटचे पडदे फार सुरेख दिसतात. हे पडदे अतिशय मऊ असून प्रिंटेड आणि प्लेन अशा दोन्ही स्वरूपात मिळतात. वेलवेटचे कापड फार महाग असते. २२५ रुपये मिटर या किमतीपासून हे कापड मिळते. पडद्यांचा आणखी एक लोकप्रिय प्रकार म्हणजे पॉलिस्टर क्रश मटेरियल. यामध्ये प्लेन रंगांचे पडदे दिसून येतात. हे कापड पातळ आणि सुळसुळीत असते. दोन वेगवेगळ्या रंगांचा वापर करून या पडद्यांनी घर सजवता येते. शिवाय याची किमतही जास्त नसते. विस्कोमगोप कर्टन हादेखील पडद्याचा एक प्रकार आहे. विशिष्ट दोऱ्यापासून हा पडद तयार केला जात असून ते फारच आर्षिक असतात. शोभेसाठी आपण या पडद्याचा नक्कीच वापर करून घेऊ शकतो. सध्या उन्ह्याची चाहूल लागत आहे अशा वेळी कॉटनचे पडदे सर्वात चांगला उपाय ठरतो. मात्र घरात जास्त ऊण येत असल्यास असे पडदे लवकर खराब होण्याची शक्यता असते. **(उत्तरार्ध)**

**गंमतग्यान**

### पिन कोड म्हणजे काय ?

पत्रांवर एकसारखी नावे किती तरी ठिकाणी असू शकतात. परिणामी पत्राची छाननी करताना बऱ्याच अडचणी येऊ शकतात. टपालाची विभागणी करण्यात गोंधळ निर्माण होऊ शकतो. यामुळे पत्र आपल्या नेमक्या स्थानी पोहोचणे अवघड होते. या समस्येचे वैज्ञानिक पद्धतीने निराकरण करण्यासाठी पिन कोड प्रणाली विकसित केली गेली आहे. यामध्ये सहा अंकी संख्येच्या माध्यमातून कर्मचाऱ्याला नेमके ठिकाण चटकन समजते आणि पत्र नेमक्या ठिकाणी पाहोचते. पिन कोड नंबरच्या सहा अंकांची संख्या उजवीकडून डावीकडे कार्यालयाच्या भौगोलिक स्थितीची माहिती देते. भारताला एकूण आठ क्षेत्रात विभागलेले आहे. पिन कोड नंबरचे पहिले तीन अंक त्या विभागणी युनिटबाबत माहिती दर्शवतात ज्या अंतर्गत कार्यालय असते. शेवटचे तीन अंक विभागणी युनिटच्या अंतर्गत असणाऱ्या त्या विशिष्ट कार्यालयाबाबतची माहिती दर्शवतात. आधुनिक टपाल प्रणालीची स्थापना भारतात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे १७६६ मध्ये लॉर्ड क्लाईव्ह यांनी केली होती. १७७४ मध्ये वॉरेल हेस्टिंग्ज यांनी पोस्ट मास्टर जनरल यांच्या अख्त्यारित कोलकाता जीपीओची स्थापना केली. वर्तमान स्वरूपाची स्थापना १ ऑक्टोबर १९५४ मध्ये झाली. भारत जगभरातील सर्वात मोठे टपाल नेटवर्क ठेवणारा देश आहे. **(उत्तरार्ध)**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा हल्लाबोल

# बीडचे पर्यटनस्थळ करू नका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** बीड जिल्ह्यात घडलेलं संतोष देशमुख हत्या प्रकरण गंभीर आहे. त्यामुळे बीड जिल्ह्याला पर्यटनस्थळ करुन बदनाम करू नका. बीड जिल्ह्यात कोणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षातील नेत्यांवरही हल्लाबोल केला. काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

बीड इथल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. बीड आणि परभणी इथल्या घटना गंभीर आहेत.

या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र विरोधकांनी बीडला पर्यटनस्थळ करून बदनाम करू नये, असा हल्लाबोल देवेंद्र फडणवीस यांनी केला.

बांगलादेशामध्ये हिंदू नागरिकांवर अत्याचार होत आहेत. मात्र अनेक बांगलादेशी नागरिक राज्यात अवैधपणे राहत असल्याचं स्पष्ट झालं. कल्याण आणि परिसरातून बांगलादेशी नागरिकांना पकडण्यात आलं आहे.


राज्यातील इतर भागातही अवैधपणे बांगलादेशी नागरिक राहत आहेत. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यम प्रतिनिधींनी प्रश्न विचारला. त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, "राज्यात अवैधपणे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना बाहेर काढण्यात येईल. याबाबत बांगलादेशी नागरिकांची शोधमोहीम घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल," असं त्यांनी सांगितलं.

## इन्फोग्राफिक्स

# मुंबई मनपावर महायुतीचाच महापौर

### भाजपने केली मोर्चेबांधणी

**मुंबई :** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षाकडून जय्यत तयारी सुरू झालीय. त्याच दृष्टीनं मोर्चेबांधणी आणि रणनीती आखण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून बुधवारी मुंबई



भाजपाकडून कोअर कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारमधील मंत्री आणि भाजपाचे विद्यमान मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्यासह मंगलप्रभात लोढा, मिहीर कोटेचा, अमित साटम, प्रवीण दरेकर आदी नेते उपस्थित होते. या बैठकीत आगामी मुंबई महापालिका निवडणुकीबाबत चर्चा झाली. मात्र मुंबई भाजपा अध्यक्षाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याची माहिती आमदार अमित साटम यांनी दिली. भाजपाची कोअर कमिटीची बैठक संपल्यानंतर त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. आगामी पालिका निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मुंबईत १ जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत भाजपातील सदस्य अभियान राबवलं जाणार आहे. तसंच ५ जानेवारी रोजी मुंबईतील विविध ठिकाणी भाजपाकडून बूथनिहाय टेबल लावण्यात येणार असून, मुंबईकरांमध्ये जनजागृती आणि सदस्य नोंदणी अभियान राबवलं जाणार आहे. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीतल्या भव्य यशामुळे विश्वास दुणावलेली महायुती दीडशेपेक्षा जास्त जागा जिंकून मुंबई महापालिकेमध्ये बहुमत प्राप्त करेल आणि महायुतीचा महापौर हा मुंबईच्या महापालिकेमध्ये बसेल, असा विश्वास अमित साटम यांनी व्यक्त केलाय. मुंबई भाजपाची कोअर कमिटीची आज बैठक पार पडली. या बैठकीत आगामी पालिका निवडणुक यावर चर्चा करण्यात आलीय. येणाऱ्या पालिका निवडणुकीत मुंबई पालिकेला भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा "एक है तो सेफ आहे..." हा नारा पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, त्या दृष्टीने निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचं अमित साटम यांनी सांगितलं.

## » Selected

### उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळली

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमधील भीमताल शहराजवळ बुधवारी बस दरीत कोसळली. या भीषण अपघात चार जण ठार तर २४



हून अधिक जण जखमी झाले. बस अल्मोडा येथून हल्द्वानीकडे जात असताना भीमतालजवळ ती दरीत कोसळली. अनेक प्रवासी बसमधून बाहेर फेकले गेले. घटनास्थळी 'एसडीआरएफ'चे पथक स्थानिक पोलिस, स्थानिक लोक आणि अग्निशमन विभागाने धाव घेतली. बचावकार्य सुरू असून, प्रवाशांना दरीत बाहेर काढले जात आहे. या भीषण अपघातात चार जण ठार झाले असून, यातील जखमींना भीमताल येथे नेण्यात आले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### लोकसेवा आयोगाच्या उमेदवारांवर लाठीलार्ज

**नवी दिल्ली :** बिहारची राजधानी पाटण्यात बुधवारी बीपीएससीच्या उमेदवारांवर लाठीचार्ज करण्यात आला. बिहार लोकसेवा आयोगाच्याकार्यालयाला घेराव घालण्यासाठी आलेल्या उमेदवारांचा पोलिसांनी पाठलाग करून त्यांना मारहाण केली. काही महिला उमेदवारांना काठ्यांनी मारहाणही करण्यात आली. यानंतर उमेदवारांमध्ये प्रचंड नाराजी आहे. नुकतीच घेण्यात आलेली बीपीएससी ७० वी पूर्व नागरी सेवा परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थी अनेक दिवसांपासून आंदोलन करत आहेत. बुधवारी ते आयोगाच्या कार्यालयाला घेराव घालण्यासाठी गेले असता पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला. मिळालेल्या माहितीनुसार, गर्दानीबाग येथे धरणे आंदोलन करणारे बीपीएससीचे उमेदवार बुधवारी दुपारी आयोगाच्या कार्यालयात पोहोचले.

# शिर्डी नववर्षाच्या स्वागतासाठी सज्ज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**शिर्डी :** २०२४ या सरत्या वर्षाला निरोप आणि २०२५ या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी शिर्डी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत लाखो भाविक येणार असल्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३१ डिसेंबर रोजी रात्री साई मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुलं ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिलीय.

चालू वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीने शिर्डीत चार दिवसीय शिर्डी महोत्सव साजरा करण्यात येणार असून, या महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आलीय. २९ डिसेंबर ते १ जानेवारी अखेर ४ दिवस विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनदेखील साई संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिलीय.

नवीन वर्षानिमित्ताने साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. तसेच शिर्डी महोत्सवाकरिता राज्यासह देशातील अनेक भागातून ९० पायी पालख्या येणार असल्याची नोंदणी भाविकांनी केलेली आहे. येणाऱ्या साईभक्तांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात तसेच अतिरिक्त निवासव्यवस्थेसाठी साई धर्मशाळा आणि भक्त निवासस्थान या ठिकाणी ३४ हजार ५०० चौरस फुटाचे मंडप उभारण्यात आलेले आहे.

या महोत्सवाकाळात साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकरिता सुमारे १२० क्विंटल साखरेचे मोफत बुंदी प्रसाद पाकिटे आणि सुमारे ४०० क्विंटल साखरेचे मोतीचूर लाडू प्रसाद पाकिटे तयार करण्यात आली आहेत. तसेच उत्सव कालावधीत भक्तांना प्रसाद लाडू पॅकेट सहजतेने उपलब्ध व्हावे, यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

## हिमाचलमध्ये बर्फवृष्टीत ४ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी हिमाचल प्रदेशातील शिमला आणि मनाली येथे मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले आहेत. दरम्यान, गेल्या २४ तासांत हिमाचलमध्ये जोरदार हिमवृष्टी झाली असून, यामुळे किमान ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर हिमाचलमधील तीन राष्ट्रीय महामार्गांसह किमान २२३ रस्ते बंद झाले आहेत.

शिमला, कुल्लू, मंडी, चंबा आणि सिरमौर जिल्ह्यांसह किन्नौर, लाहौल आणि स्पीती भागात जोरदार हिमवृष्टी झाली आहे. येथे प्रतिकूल हवामान असतानाही पर्यटकांचा ओघ कमी झालेला नाही. शिमल्यातील हॉटेल्स हाउसफुल्ल झाली आहेत. येथील खोल्यांचे बुकिंग ७० टक्के झाले आहे. गेल्या डिसेंबरच्या तुलनेत हे प्रमाण ३० टक्के अधिक आहे, असेही वृत्तात पुढे म्हटले आहे. अटारी ते लेह, कुल्लू जिल्ह्यातील सांज ते औत आणि किन्नौर जिल्ह्यातील खाब संगम आणि लाहौल आणि स्पीती जिल्ह्यातील ग्रामफू येथील राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत.

# मणिपूरमध्ये स्फोटाचा कट उधळला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यातील लीसांग गावात स्फोटाचा मोठा कट उधळला असून आसाम रायफल्स आणि पोलिसांनी इंफाळ-चुराचंदपूर रस्त्यावरील एका पुलाखाली ३.६ किलो स्फोटके, डिटोनेटर्स, कॉर्डटेक्स आणि इतर वस्तू जप्त केल्याची माहिती भारतीय लष्कराने दिली आहे.

हिंसाचारग्रस्त मणिपूरमध्ये दहशत निर्माण करण्याचे सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. भारतीय लष्कराच्या सक्रियतेमुळे कट उधळून लावला आहे. मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यातील लेसियांग गावात आयईडी असल्याची माहिती लष्कराला मिळाली. यावर आसाम रायफल्स युनिट आणि मणिपूर पोलिसांनी संयुक्त शोध मोहीम सुरू केली. इंफाळ-चुराचंदपूर रस्त्यावरील एका पुलाखाली ३.६ किलो स्फोटके, डिटोनेटर आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या.

तत्पूर्वी, मणिपूरमधील सुरक्षा दलांनी सोमवारी चुराचंदपूर जिल्ह्यातील तेजांग गावात शोध मोहीम राबवली. येथून तीन देशी बनावटीचे रॉकेट, मॅगझीनसह एक ३०३ रायफल, चार पिस्तुले, सहा देशी बनावटीचे बॉम्ब आणि ४५ कांड्या कमी दर्जाची स्फोटके व इतर काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

लेसियांग गावात सुरक्षा दलांनी नऊ आयईडी आणि डिटोनेटर जप्त केले. याशिवाय, इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील मारिंग सँडांगसेंगबा येथे नगारियान टेकडीवर मॅगझिनसह एक ७.६२ मिमी एलएमजी, एक सिंगल बॅरल बंदूक, एक ९ मिमी पिस्तूल आणि दोन ग्रेनेड आणि इतर काडतुसे देखील जप्त करण्यात आली आहेत. १७ डिसेंबर रोजी भारतीय लष्कर आणि मणिपूर पोलिसांनी मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील मॅपिथेल रिज परिसरातून २१.५ किलो वजनाचे पाच आयईडी जप्त केले होते.

# समृद्धी महामार्गावरील अपघातात ३ जण ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** समृद्धी महामार्गावर कार दुभाजकावर धडकून तीन जणांचा जागीच मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाले. शिर्डी इथून साईबाबांचं दर्शन घेऊन परतत असताना मंगळवारी सायंकाळी पिंपरी फाट्यावर हा अपघात झाला. अपघातातील मृत आणि जखमी नवी मुंबईजवळील खालापूर येथील रहिवासी आहेत. गीता रमेश अग्रवाल, निर्मय अनुज गोयल, अनुज रमेश गोयल, यांचा जागीच मृत्यू झाला. तर रमेशचंद्र अग्रवाल, मीती अनुज गोयल आणि दिव्यांशी अनुज गोयल हे गंभीर जखमी झाले. जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

नवी मुंबई इथलं खालापूर भागातील गोयल आणि अग्रवाल कुटूंब शिर्डी इथं स्विफ्ट कारमधून दर्शनासाठी गेलं होतं. शिर्डीहून परतत असताना नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत समृद्धी महामार्गावरील पिंपरी फाटा इथं भरधाव वेगातील कारवरील चालकाचं नियंत्रण सुटलं. कार दुभाजकावर आदळून दुसऱ्या मार्गिकेत जाऊन उलटली. या अपघातात गीता रमेश अग्रवाल (७२), निर्मय अनुज गोयल (१६), अनुज रमेश गोयल (५२, चालक), यांचा जागीच मृत्यू झाला. रमेशचंद्र अग्रवाल (८०), मीती अनुज गोयल (४५) आणि दिव्यांशी अनुज गोयल (२१) हे गंभीर जखमी झाले. मृत आणि जखमींना रुग्णवाहिकेतून घोटीजवळील एसएमबीटी या रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

पंढरी संचार छायाचित्रसेवा




## सांताक्लॉजची कलाकृती...

**पुरी :** भारताच्या पूर्वेकडील ओडिशा राज्यातील पुरी येथील समुद्रकिनाऱ्यावर, सुदर्शन पटनायक यांनी सांताक्लॉजची साकारलेली कलाकृती. यासाठी त्यांनी वाळूसह चॉकलेटचा वापर केला.

## एक देश, एक निवडणूक; जेपीसीची ८ तारखेला बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाच्या संयुक्त समितीची बैठक ८ जानेवारी रोजी होणार आहे. ३९ सदस्यीय जेपीसीची ही पहिली बैठक असेल. या बैठकीत कायदा मंत्रालयाचे अधिकारी या विधेयकाच्या मुख्य वैशिष्ट्यांबद्दल समितीला माहिती देतील आणि देशाला विधेयकचा कसा फायदा होईल हे सांगतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. मात्र, अद्याप लोकसभा सचिवालयाने या बैठकीची अधिकृत घोषणा केली नाही.

जेपीसी या विधेयकाचे परिणाम आणि फायदे समजावून घेणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात 'एक देश एक निवडणूक' मांडण्यात आले. विधेयकाला तीव्र विरोध झाल्याने ते जेपीसीकडे पाठवण्यात आले आहे. जेपीसीकडे विधेयकावर चर्चा करण्यासाठी ९० दिवसांचा कालावधी आहे. या समितीत लोकसभेतील २७ आणि राज्यसभेतील १२ खासदारांचा समावेश आहे.

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार नामदेव भगवान खुटवड रा. हातवे खुर्द ता. भोर जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म- मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३ (३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांचा स्वतःचा जन्म मौजे. हातवे खुर्द ता.भोर जि.पुणे येथे दि.०२/०६/१९६७ रोजी झालेचे नमूद करुन सदर जन्माची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/जन्म/एस. आर/१५/११/२०२४
दिनांक :- १९/१२/२०२४
ठिकाण :- भोर

शिक्का

**(डॉ. विकास खरात)**
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

जाहीर नोटीस
उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय
७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०८३२ Email - sdopune@gmail.com
क्र. मृत्यु रजि./एसआर/५४/२०२४
१) श्री. चंद्रकांत दगडू मानकर, रा. सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे. अर्जदार
विरुध्द
१) जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे जाबदेणार
२) पंचायत समिती हवेली
विषय : जन्म - मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम २०२३ नुसार
जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. चंद्रकांत दगडू मानकर, रा. सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे (अपिलार्थी) यांनी त्यांचे आई कै. भीमाबाई दगडू मानकर, यांचा मृत्यु दि. ०९/०१/२०१८ रोजी मौजे सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे येथे झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम ११ (३) प्रमाणे मृत्यु नोंदणीचा करण्याचा आदेश मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि. २९/११/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.
ठिकाण- पुणे
दिनांक:- २९/११/२०२४
शिक्का
(डॉ. यशवंत माने)
उपविभागीय दंडाधिकारी, हवेली
उपविभाग पुणे

**ई-लिलाव अधिसूचना - स्क्रॅप**
**अ‍ॅल्युमिनियम प्लेट्स, विविध उपकरणे, यंत्रसामग्री आणि फर्निचर**
**लार्सन अँड टुब्रो लिमिटेड, तळेगाव, पुणे**
**- संकेतस्थळ -**
**www.auctionindia.com**
**लिलावाची तारीख ०२-०१-२०२५**
**वेळ : दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

## नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार युद्धनौका

# सागरी सुरक्षेसाठी भारताचे महत्त्वाचे पाऊल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** सागरी सुरक्षा आणि हिंदी महासागर क्षेत्रातील चीनच्या वाढत्या प्रभावाचा मुकाबला करण्यासाठी भारत आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलणार आहे. भारतीय नौदलाच्या ताफ्यात पुढील महिन्यात दोन स्वदेशी युद्धनौका आणि एक डिझेल-इलेक्ट्रिक पाणबुडी (पाणबुडी) समाविष्ट होणार आहे. याशिवाय रशियन बनावटीची युद्धनौका आयएनएस तुशीलही लवकरच भारतात दाखल होणार आहे.

या नव्या युद्धनौकांपैकी सर्वात मोठी युद्धनौका म्हणजे ७,४०० टन वजनाची गाइडेड क्षेपणास्त्र विध्वंसक युद्धनौका आयएनएस सुरत. त्याखालोखाल स्टेल्थ फ्रिगेट आयएनएस निलगिरी (६,६७० टन) आणि पाणबुडी वाघशीर (१,६०० टन) यांचा क्रमांक लागतो. हे सर्व अत्याधुनिक सेन्सर आणि शस्त्रांनी सुसज्ज आहेत, जे त्यांना अत्यंत घातक बनवतात. आयएनएस सुरत आणि आयएनएस निलगिरी ही युद्धनौका गेल्या आठवड्यात मुंबईच्या माझगाव डॉकने (एमडीएल) नौदलाच्या ताब्यात दिली. १६४ मीटर लांबीची आयएनएस सुरत ही प्रकल्प-१५ बी अंतर्गत बांधण्यात येणारी चौथी युद्धनौका आहे. यापूर्वी आयएनएस विशाखापट्टणम, आयएनएस मरमुगाव आणि आयएनएस इम्फाळ या लढाऊ विमानांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला होता.

आयएनएस सुरत ही नौदलाची पहिली आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सक्षम युद्धनौका असून या युद्धनौकेमुळे त्याची ऑपरेशनल क्षमता अनेक पटींनी वाढणार आहे. ७२% स्वदेशी सामग्रीसह तयार केलेले हे जहाज ४,००० सागरी मैलांपर्यंत प्रवास करू शकते. यात ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र, बराक-८ मध्यम पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र, ७६ मिमी सुपर रॅपिड गन आणि पाणबुडीविरोधी शस्त्रे आहेत.

**PUBLIC NOTICE**

KNOW ALL MEN by this Notice given to public at large that my clients **Mr. Kunal Dipchand Rathi & Mrs. Komal Kunal Rathi,** R/at Pune have agreed to purchase the Schedule Flat from its owner **Smt. Meera Jain wd/o Jaiveer Jain** R/at Mumbai, on basis of assurances made by her. The said flat was originally owned by **Smt. Meera Jain and her husband Late Mr. Jaiveer Jain.** Mr. Jaiveer Jain has expired on 06/07/2021, leaving behind his widow viz. Meera, one son viz. Amit Jain & one daughter viz. Shilpa J. Jaiswal. The owner has assured that aforesaid are his only legal heirs. The said owner & my client has agreed to enter into sale transaction & further the said owner has assured my client that the said premises is free from any encumbrances, charge, etc. whatsoever and is having clean & clear marketable title. However if any person/s having any claim, right, title and/or interest in the said premises in any manner whatsoever by way of Sale, Transfer, Agreement, Gift, Lease, License, allotment, Exchange, Mortgage, Charge, Lien, Maintenance, Easement, Possession, Inheritance, Succession or otherwise shall raise such claim/objection and intimate the same to the undersigned advocate alongwith documentary proof thereof, within **21 days** from the publication of this Public Notice, failing which my client will deem the assurances of the owner to be true & correct and that said premises being of clean and clear marketable title and thereby shall complete the sale transaction. Thereafter i.e. after expiry of above period any such claims/objections/reliefs, etc., if any, shall not be entertained and shall be deemed to have been willfully waived off and/or abandoned. Hence this Public Notice.

**Schedule of Flat Property**

A residential flat unit bearing **Flat No.D-1/402** admeasuring about 208.72 sq.mtrs. i.e. 2245 sq.fts. (carpet) + Open Terrace Area of 15.34 sq.mtrs. i.e. 165 sq.fts. situated at the **4th Floor** of **Building D-1** and alongwith Parking Space No. D-1/6 at the Lower Level of Building, in society known as **Kumar Sienna** situated at Survey No. 238/1, 238/2, 238/3A, 238/38, 238/4, 238/5, 239/3A, 239/3B, 239/5A, 239/5C/1, 239/5C/2, 239/5D, 239/5E, 239/1, 239/2, 239/3A, 240/1 + 2A 240/1 + 2A / 1 240/1 + 2A / 2 240/2B, 241/1 + 4/1 241/1 + 4/2 241/2 + 3 situated at Division No. 27.6, Sadesatra Nali at Village Hadapsar, Taluka Haveli, District: Pune

Pune

Date: 25/12/2024

**Md. Arshad Nehal**
**ADVOCATE**
Office No. 16, Ground Floor,
Gulmohar Apartments, Behind SBI,
East Street. Camp,Pune – 411001
**Mob. No.: 9422922938 / 9762959808**
**Email: arshad.nehal@gmail.com**

**जाहीर नोटीस**
**उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**
७. निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१

क्र. मृत्यु रजि./एसआर/५४/२०२४

**१) श्री. चंद्रकांत दगडू मानकर,**
**रा. सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे.** ...अर्जदार
**विरुध्द**
**१) जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे** ...जाबदेणार
**२) पंचायत समिती हवेली**

**विषय :- जन्म - मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम २०२३ नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री. चंद्रकांत दगडू मानकर, रा. सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे** (अपिलार्थी) यांनी त्यांचे **आई के. भीमाबाई दगडू मानकर, यांचा मृत्यु दि. ०९/०१/२०१८ रोजी मौजे सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे येथे** झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम ११ (३) प्रमाणे मृत्यु नोंदणीचा करण्याचा आदेश मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दीझाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्रात्प न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस आज दि.२९/११/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण- पुणे
दिनांक:- २९/११/२०२४


शिक्का

**(डॉ. यशवंत माने)**
**उपविभागीय दंडाधिकारी, हवेली**
**उपविभाग पुणे**

## नोंद
## ॲलर्जी ग्लुटेनची

**शंभरापैकी एका व्यक्तीला गव्हातील ग्लुटेन किंवा सेलिएकचे वावडे असते. व्हीट ॲलर्जी किंवा ग्लुटेन ॲलर्जी असल्याचे आढळून आले आहे. या ॲलर्जीने पीडित मुलांचा पूर्ण विकास होऊ शकत नाही आणि संपूर्ण उपचारही होऊ शकत नाहीत. हा एक ऑटोइम्युन आजार आहे. यामध्ये शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती आपल्याच एका प्रथिनाच्या विरोधात प्रतिद्रव्ये तयार करण्यास सुरुवात करते. या ॲलर्जीमुळे मुलांची उंची वाढत नाही किंवा रक्ताची कमतरता भासते. याचे कारण त्यांचे पोषण पुरेसे होत नाही. तज्ज्ञांच्या मते यावर उपाय म्हणजे ग्लुटेन असलेला पदार्थ न खाणे किंवा वर्ज्य करणे.**

## हेल्दी टिप्स



केसातील उवा, लिखा मरण्यासाठी न्हाण्यापूर्वी केसांना लिंबूरस लावावा. खरखरीत, कोरडे केस मऊ होण्यासाठी लिंबूरस केसांच्या मुळांना लावावा. तासानंतर केस धुवावेत. डोक्यातील खाज कमी होण्यासाठी खोबरेल तेल, लिंबूरस चोळावा.



रांजणवाडी आल्यास त्या भागावर तुरीची डाळ उगाळून लेप लावावा.



किडलेली दाढ दुखत असेल तर वावडिंग पुडीचा बोळा धरावा.



डोकेदुखी थांबण्यासाठी रात्री काळ्या मनुका खाऊन पाणी प्यावे.



आले हे औषधे आहे. यातील फेनोलिकमुळे अपचन आणि जळजळीपासून आराम मिळतो. आले वेदनाशामक, तापमान कमी करणारे आहे. आल्यामुळे तोंडात लाळेची निर्मिती जास्त प्रमाणात होते. यामुळे घास गिळायला सोपे जाते.



डाळिंबाची पेस्ट आणि दही यांचे मिश्रण करुन केसाला लावल्यास केस गळणे थांबते आणि केस मुलायम होतात. डाळिंब उत्तम पित्तशामक असून कोणत्याही प्रकारचा पित्ताचा त्रास डाळिंब खाल्ल्यावर कमी होतो.



कच्चा कांदा आणि लसूण आपल्या शरीरातील दाह कमी करतात. सतत कांदा खाल्यामुळे अजीर्ण होत नाही. उन्हाळ्यात उष्म घातापासून कांदा आपल्या शरीराचा बचाव करतो. तसेच अपचन होत नाही. विदर्भासारख्या भागामध्ये उन्हाळ्यात कांदा जवळ ठेवून घराबाहेर पडतात.

# बुनियनच्या अंतरंगात....

काही व्यक्तींच्या पायांचे निरीक्षण केल्यास अंगठ्याच्या सांध्यापासून तो पुढच्या बोटाकडे तिरका झालेला दिसतो आणि सांधा बाहेरच्या बाजूला वाढल्यासारखा दिसतो. हाड वाढल्यासारखे भासत असले तरी ते वाढलेले नसते; तर ते सांधा अर्धवट निखळून तिरके झालेले असते. त्यालाच बुनियन असे म्हणतात.

काही व्यक्तींच्या बाबतीत हे वेदनादायी असते तर काहींना वेदना होत नाहीत. यावर काही घरगुती उपाय केले जाऊ शकतात. त्यांच्या मदतीने पायाची स्थिती सुधारता येते शिवाय याच्या प्रगतीला अटकाव करता येतो

बुनियन म्हणजे अंगठ्याचा सांधा अर्धवट निखळून तो शेजारील बोटांकडे झुकतो. त्याचा परिणाम अर्थातच व्यक्तीच्या चालण्याच्या वेगावर होतोच. शिवाय दिवसभराच्या कामांवरही होतो. पायाच्या अंगठ्याच्या सांध्याला हा त्रास होताना दिसतो. हाडे आणि पेशी यांचा या व्यंगात समावेश असतो. पायाच्या अंगठा त्यापुढील बोटांकडे झुकतो. थोडक्यात सांधा अर्धवट निखळून होणारी ही स्थिती आहे.

● **कोल्ड कॉम्प्रेसेस** : बुनियन झालेल्या पायावर फार वेळ भार पडला तर बुनियन किंवा पायाच्या सांध्याचे हे दुखणे वेदनादायक होऊ शकते. मग वेदना कमी करण्यासाठी आणि सूज कमी व्हावी म्हणून कोल्ड कॉम्प्रेसेस हा उत्तम उपचार असतो. थंडपणामुळे नस थोडीशी बधीर झाल्यासारखी होत असल्याने वेदनेमध्ये थोडा आराम मिळतो.



पायाच्या पंज्याने काही ताणाचे व्यायाम केले तर बोटांमध्ये लवचिकपणा राहतो आणि पाय हलवणे सोपे जाते. त्यामुळे रक्ताभिसरण सुधारते. लाल रक्त पेशींची कार्यक्षमता वाढते आणि हाडांची पुनर्जुळणी होऊ शकते. अर्थात व्यायामामुळे पायाच्या पंज्याची झालेली झीज भरून निघत नाही.

पायाच्या ज्या भागामध्ये हा त्रास जडला आहे त्याला कोमट तेलाने मालिश केल्याने वेदना कमी होण्यास मदत होते. मसाज केल्याने रक्ताभिसरणात वाढ होऊन वेदना कमी होतात तसेच दाह सुद्धा कमी होता. पंजावरील दबाव कमी होतो. त्यामुळे पायाला घट्टे पडणे किंवा खरुज सारखा त्रास उद्भवण्याचा धोका टळतो.

सैंधव मीठाच्या पाण्यात पाय बुडवल्याचा फायदा यात होऊ शकतो. त्यामुळे ठणका कमी होऊ शकतो. सैंधव मीठामध्ये खूप अधिक प्रमाणात मॅग्नेशिअम सल्फेट असते. त्यामुळे बुनियनमुळे होणारी आग किंवा दाह आणि वेदना कमी होतात.

बुनियनच्या समस्येवर कॅमोमाईल हा अगदी उत्तम वनषौधींचा पर्याय आहे. कॅमोमाईलचे दाहप्रतिबंधक गुणधर्म सूज कमी करण्यास, दाह कमी होण्यास तसेच वेदना कमी करण्यातही लाभदायी आहेत.

# जपा दृष्टीला



नेत्रविकारतज्ज्ञ लहान मुलांमध्ये चष्म्याचा नंबर देण्याअगोदर डोळ्यांत थेंबाचे औषध टाकून डोळ्यांच्या आत असणाऱ्या स्नायूंना शिथिल केले जाते, असे केल्यावर डोळ्यांचे नंबर अचूक काढता येतात. चष्म्याच्या प्रकाराची निवड करणेही आवश्यक आहे. लहान मुलांमध्ये चष्मा काचेचा न करता 'फायबर'मध्ये करणे सुरक्षित असते.

जगात लहान मुलांमध्ये चष्म्याचे प्रमाण वाढत चालले आहे. सध्याच्या जीवनात खूप बदल झालेला आहे. दिवसाचा खूप वेळ संगणक आणि मोबाईलवर काम करताना जातो. जास्त वेळ जवळ बघत असतो. मनुष्याचा विकास किंवा उत्क्रांती जेव्हा झाली तेव्हा तो जास्त वेळ निसर्गाच्या सान्निध्यात असे आणि डोळ्याची नजर लांब बघण्यासाठी जास्त वापरली जात असे. परंतु हल्ली तासन्तास संगणकावर काम करायला लागत असल्यामुळे डोळ्यांवर खूप ताण येतो. लहान मुलांमध्ये संगणकाच्या आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे चष्मा लागण्याचे प्रमाण किंवा डेळ्यांचे इतर आजार वाढत आहेत.

● **चष्म्याच्या नंबरचे प्रकार**

नंबर सामान्यपणे तीन प्रकारचे असतात, लघुदृष्टिदोष (मयोपिया), दूरदृष्टीदोष (हायपरपर मेट्रोपिया) आणि 'ॲस्टिगमॉटिस्म'म्हणजे सिलिंडर नंबर. लघुदृष्टिदोषामध्ये लांबची दृष्टी कमजोर असते. यांच्यात 'मायनस' नंबरचा चष्मा दिला जातो. या तिन्हीपैकी मयोपिया सगळ्यात कमी दुष्परिणाम आणतो. लहान मुलांमध्ये किंवा मोठ्यांमध्येसुद्धा सगळ्यात जास्त प्रमाणात मयोपिया होतो. पण मयोपियामध्ये मायनस नंबर वयानुसार वाढत जातो. वाढण्याचे कारण जातो. वाढण्याचे कारण आहे. डोळ्याची वाढ थोडक्यात जेव्हा उंची वाढते तेव्हा डोळ्याची लांबीसुद्धा वाढते. लहान मुलांमध्ये प्लस नंबरचा सगळ्यात मोठा दुष्परिणाम आहे. आळशी डोळे उद्भवणे 'ॲस्टिगमॉटिक्स'मध्ये डोळ्यांचा अकार वर्तुळासारखा नसतो. अंड्यासारखा असतो. त्याच्यामुळे बऱ्याचदा दृष्टी तपासणी करताना काही अक्षरे दिसतात आणि काही दिसत नाहीत. रूग्णाला तपासणीवेळी तक्रार नसते. पण तपासणीमध्ये लक्षात येते, की डोळ्याची दृष्टी स्पष्ट नाही.

**मोठ्यांमधील उपचार**

● मोठ्यांमधील वय वाढल्यावर डोळ्यांत कमजोरी निर्माण होते. यांचे प्रमाण आहे चाळिशीचा नंबर.

● पूर्वी चष्मा, वर आणि खाली काचा असायच्या ज्यांनी बघताना खोल दिसायच्या, पण सध्या 'प्रोग्रेसिव्ह'चष्म्यांनी सर्व कामात लांबचे दिसणे, कॉम्प्युटर आणि वाचन शक्य आहे आणि चष्म्यांमध्ये रेघ नसते.

● कॉन्टॅक्ट लेन्स आणि लेसरद्वारे नंबरचा चष्मा न घालता राहणे शक्य आहे. चष्म्याचा नंबर हा आजार नाही एक अवस्था आहे आणि त्याचे निदान आवश्यक आहे.

लहान वयातील उपचार

● नवजात शिशूमध्ये प्लस नंबर नैसर्गिक असतो. जशी त्यांची उंची वाढते हा नंबर कमी होतो आणि डोळे चांगले होतात. डोळ्यांचे एक वैशिष्ट्ये आहे. की डोळे नेहमी चांगले होण्याचा प्रयत्न जन्मानंतर पहिल्या तीन वर्षात होतो.

● नंबरचा चष्मा देण्याच्या आधी विचार केला जातो. बऱ्याचदा छोटे नंबर म्हणजे दोन किंवा तीन प्लस किंवा मायनस नंबर असेल, तर चष्मा देणे गरजेचे नाही. कारण 'आळशी डोळे'होऊ शकतात. पण चौथ्या वर्षानंतर नंबर असेल तर चष्मा देणे गरजेचे आहे. काही मुलांमध्ये तिरळेपणा प्लस नंबरच्या चष्म्याने पूर्णपणे घालविता येतो. जसे मूल मोठे होते तशी त्यांची उंची वाढते त्याचबरोबर डोळ्यांची लांबी वाढते आणि तिरळेपणा आणि नंबर दोन्ही एका वेळेस जातात.

● शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये त्यांच्या गरजेनुसार चष्मा दिला जातो. लहान मुलांमध्ये चष्म्याचा नंबर देण्याअगोदर डोळ्यांत थेंबाचे औषध टाकून डोळ्यांच्या आत असणाऱ्या स्नायूंना शिथिल केले जाते. असे केल्यावर डोळ्यांचे नंबर अचूक काढता येतात. चष्म्याच्या प्रकाराची निवड करणेही आवश्यक आहे. लहान मुलांमध्ये चष्मा काचेचा न करता 'फायबर'मध्ये करणे सुरक्षित असते. फुटण्याची शक्यता नसते. पण फायबरच्या चष्म्यावर खरखरण्याचे प्रमाण जास्त असते आणि लवकर खराब होतो.

**– डॉ. रमेश मूर्ती**
नेत्रतज्ज्ञ

# बीटसेवनाचे फायदे

**अलीकडील काळात लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत लोह कमतरतेची समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवत असल्याचे दिसत आहे. विशेषतः शाकाहारी व्यक्तींच्या आहारातून पुरेसे आयर्न शरीरात जात नसल्यामुळे ॲनिमियाग्रस्तांचे प्रमाण वाढले आहे. यावर हिमोग्लोबीन वर्धक औषधांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. परंतु आपण दैनंदिन आहारात बीटाचे सेवन केल्यास ॲनिमियाला सहजगत्या लांब ठेवता येते.**



बीटामध्ये अनेक जीवनसत्त्वे असतात, जी शरीराला अनेक आजारांपासून वाचवतात. बीटामध्ये सोडियम, पोटॅशियम, कॅल्शियम, फॉस्फरस आणि इतर अनेक पोषक घटक असतात. त्यांच्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते, तसेच त्वचेसाठीही ते फायदेशीर ठरते. बीटमध्ये लोह मुबलक प्रमाणात आढळते, जे शरीरातील रक्त वाढवण्यासाठी उपयुक्त मानले जाते.

जर रक्ताच्या कमतरतेची समस्या जाणवत असेल तर बीटचा आहारात समावेश करणे अतिशय लाभदायक ठरते. बीटमध्ये असलेले नायट्रेट रक्तदाब कमी करते आणि त्यामध्ये आढळणारे ब्युटेन रक्त गोठण्यापासून वाचवते. अशा प्रकारे हृदयाशी संबंधित आजारांवर बीट उपयुक्त ठरू शकते. बीटमध्ये असलेले फोलेट आणि फायबर त्वचेसाठी फायदेशीर असतात. बीट पचायला जड असल्याने प्रकृतीनुसार याचे सेवन करावे. मध्यंतरी, नीता अंबानी यांनी बीटाच्या ज्यूसच्या साहाय्याने वजन कमी केल्याचे म्हटले होते. त्यामुळे वेटलॉससाठीही बीट उपयुक्त आहे.

# खोकल्यातील पथ्यपान

बऱ्याच लोकांनी आरोग्यानुरुप आहारासाठी स्वत:च निश्चित केलेली काही सूची असते, त्याप्रमाणे सर्दी झाली, की केळी बंद किंवा खोकला झाला की दूध टाळतात, असे प्रकार चालू असतात. लहान मुलांच्याबाबतीत अशी पथ्ये पाळणे थोडे कठीण असते, कारण मुलांना जे आवडते तेच आपण नको म्हणतो आणि त्यांना न आवडणारी गोष्ट खायला लावतो. असे अन्याय दूर करण्यासाठी निदान कफ आणि त्याची माहिती करून घेतली तरी विनाकारण करायची पथ्ये थांबतील, आणि मुले आजारपणातही थोडेफार खाऊ शकतील.

सर्दी आणि खोकला एकापाठोपाठ येणारे आजार आहेत. काही वेळा सर्दी न होता एकदम खोकला सुरू होतो. जेव्हा सर्दी होऊन खोकला होतो तेव्हा बहुतेक वेळा विषाणूच्या संसर्गामुळे झालेला असतो. तेव्हा थोडा फार ताप असतो. अशा वेळी भरपूर गरम पाणी वाहणाऱ्या नाकाला आधार देते. चहा, कॉफीसारखी गरम पेये पहिल्या दिवसाच्या सर्दी–खोकल्यात कफ बाहेर टाकायला मदत करतात. पण ती सवय लागू नये, याची काळजी घ्यावी. चहा, कॉफी आणि कोको हे घटक तयार होणारे म्युकस बाहेर टाकायला मदत करतात, त्याविरूद्ध दूध म्युकस आतच साठण्याला कारणीभूत ठरते. म्हणून दूध सुरू वातीचे काही दिवस टाळावे.




# उपचार मूळव्याधीवर

मूळव्याधीवरसुद्धा त्रिदोष, व्यक्तीची प्रकृती, रोगाची तीव्रता वगैरे अनेक गोष्टींचा विचार करून नेमक्या औषधांची योजना करावी लागते, तरीही यावर सर्वसाधारणत: केले जाणारे उपचार याप्रमाणे...

● रात्री झोपताना कपभर गरप पाण्यात दोन–तीन चमचे साजूक तूप टाकून घ्यावे.

● मोडाच्या वेदना असल्यास बेलफळाचा गर आणि पाठाचूर्ण मिसळून घ्यावे किंवा सुंठ आणि पाठाचूर्ण एकत्र करून घ्यावे.

● सुरण ही भाजी मूळव्याधीत औषधच होय. सुरण वाफवून केलेली भाजी, फुलका, तूप आणि ताक असा आहार काही दिवस घेतल्यास उत्तम फायदा होतो.



● रक्त पडत असल्यास घरचे ताजे लोणी आणि नागकेशर हे मिश्रण दिवसातून दोन–तीन वेळा घ्यावे.

● मोडाच्या ठिकाणी आग होत असल्यास दूर्वांच्या रसात भिजवलेली कापसाची घडी मोडाच्या ठिकाणी ठेवावी.

● मोड किंवा गुदभागी सूज येऊन दुखत असल्यास गोवरीच्या विस्तवावर साजूक तूप टाकून त्याबरोबर धुपाची धुरी घ्यावी किंवा खजुरांच्या बीचे चूर्ण करून त्याची धुरी घ्यावी.

● कफज मूळव्याध असून मोडाला खाज येत असल्यास जेवण्यापूर्वी तसेच जेवणानंतर सुंठ आणि ओव्याची पूड टाकून ताक प्यावे.

● मोडाच्या ठिकाणी वेदना आणि आग होत असल्यास त्यावर कोरफडीचा गर ठेवावा.

● तीळ वाटून गरम करून शेकल्यास मोडाच्या ठिकाणची वेदना कमी व्हायला मदत होते.

# समस्या ऑस्टिओ आर्थ्रायटीची

सांध्यांच्या विकारांत ऑस्टिओ आर्थ्रायटी हा आजार अनेक लोकांमध्ये आढळतो. निसर्गतः सांध्यांच्या दोन हाडांची हालचाल होताना एकमेकांवर घर्षण होऊ नये. एक चकती असते तिला कुर्चा म्हणतात. ही अनेक कारणांनी झिजते; परंतु सर्वसामान्यपणे तिची झीज भरून निघते; परंतु अनेक कारणांनी ही झीज भरून निघत नाही व त्यामुळे सांध्यांच्या हाडांना इजा होते व त्यांचा परिणाम म्हणून सांधा सुजतो व दुखतो. या विकाराला ऑस्टिओ आर्थ्रायटिस म्हणतात. यात हातापायाचे सांधे, खांदा, खुबा, गुडघा, घोटा व मणक्यांचे सांधे बाधित होतात. सर्वात जास्त गुडघ्याच्या सांध्यावर परिणाम होतो. ऑस्टिओ आर्थ्रायटी संथपणे वाढणारा आजार आहे. त्यावर कायमस्वरूपी रामबाण उपाय नाहीत.

● हाताची बोटे वारंवार मोडल्यामुळे बोटांच्या सांध्याचा ऑस्टिओ आर्थ्रायटी होतो.

अनेक लोकांना वारंवार व जोरजोरात हाताची बोटे मोडण्याची सवय असते. त्यापासून त्यांना मोकळे होण्याची भावना होते. ही एक मानसिकता आहे. ऑस्टिओ आर्थ्रायटी त्यामुळे होत नाही. त्याने सांध्यांच्या स्नायूंना व संधीबंधांना सूज येण्याची शक्यता असते.

● उंच टाचेचे बूट, चपला अथवा सॅंडल्स घातल्याने ऑस्टिओ आर्थ्रायटी होतो.

साधारणतः १ ते २ इंच उंचीच्या टाचांचे पादत्राणे घातल्याने किंवा त्याहून थोड्या जास्त उंची टाचांचे पादत्राणे कधीतरी व अधून–मधून संध्याकाळी घातल्याने ऑस्टिओ आर्थ्रायटी होत नाही; परंतु जर ती दिवस–रात्र, घरा–दारात वापरली तर धोका असतो. तसेच खूपच उंच म्हणजे अगदी बोटाच्या आकारांच्या टाचा असलेल्या पादत्राणांचा गुडघ्याच्या सांध्यांवर परिणाम होतो.



● तुमचा आहार जर असमतोल, अनियंत्रित प्रमाणात असेल तर त्याचा परिणाम म्हणून वजन वाढते. त्याचा अतिरिक्त भार गुडघ्यावर पडतो व कुर्च्यांची हाडे घासू लागतात. डॉ. व्हाईट यांच्या मताप्रमाणे तुमचे वजन एक किलो वाढले तर तुमच्या गुडघ्यावर ४ किलो वजन पडते. या वजनाचा परिणाम म्हणून ऑस्टिओ आर्थ्रायटी होतो. सांधा दुखतो म्हणून कोणताच व्यायाम नको, हे चूक आहे.

सांधा दुखत असल्यास त्या सांध्यावर भार पडणार नाही व हलक्या स्वरुपाचा व्यायाम केला तर त्याचा सर्व शरीराला फायदा होतो. सांधेदुखी हळूहळू कमी होते. व्यायामात सातत्य ठेवणे हे खूप महत्त्वाचे आहे. निरोगीने नियमित व्यायाम केल्यास ऑस्टिओ आर्थ्रायटी दूर ठेवता येतो. चालणे, पोहणे, सायकलिंग, योगा हे व्यायाम उत्तम. यामुळे सांध्याभोवतीचे स्नायू व संधीबंध बळकट होतात.

# डायपेगियाची समस्या

अन्न खाल्ल्यानंतर ते घशातून पोटात जाते. काही वेळा मात्र त्या प्रक्रियेत घशाला वेदना होतात. हा त्रास कोणत्याही वयात होऊ शकतो मात्र तो प्रामुख्याने प्रौढांमध्ये दिसून येतो. पोटातील आम्लामुळे घशाच्या उतींना इजा होतो त्यामुळे घशाच्या आतल्या बाजूच्या भिंती आकुंचन पावतात. हा आजार तसा दुर्मिळ आहे पण कधी कुणाला झाल्यास त्यावर काय उपचार करता येतील याची माहिती घेऊया.

गिळण्यात येणाऱ्या अडचणी म्हणजेच डायपेगिया. अन्न मग ते पेय पदार्थ असो किंवा घट्ट पदार्थ तोंडातून गिळण्यास त्रास होतो.



डायपेगियामध्ये वेदनाही होऊ शकतात. काही बाबतीत घशाला सूज येण्याचीही शक्यता असते. घशाच्या खालच्या बाजूचे स्नायूंना योग्य आराम मिळाला नाही तर ते खाल्लेले अन्न पोटात जाऊ देत नाहीत त्यामुळे अन्न पुन्हा घशाशी येते. घशाच्या भिंतींचे स्नायूंना अशक्तपणा आल्यास ही परिस्थिती काही कालावधीनंतर अजून बिकट होऊ शकते.

**कारणे–** ● गिळण्यानंतर बहुतेक वेळा घशाची पोकळी अरुंद किंवा संकुचित झाल्याने गिळताना खूप दाब घशावर पडतो.

● घशाची पोकळी अरूंद झाल्याने अन्नाचे मोठे घास घशात अडकतात. गॅस्ट्रोफागेल रिफ्लक्स सारख्या आजारांमध्ये घशात ट्यूमर किंवा पेशींना इजा झाल्याने अन्नपदार्थाचे मोठे तुकडे घशात अडकू शकतात.

● घशात काही वेळा अन्नाचे घास अडकतात. ज्या म्हाताऱ्या व्यक्तींना दाताचे काही समस्या असल्याने चावताना त्रास होतो त्यामुळे घास घशात अडकतो.


● गिळण्याच्या त्रासामुळे शरीरात अन्न कमी प्रमाणात गेल्याने वजन अचानक घटते. त्यामुळे अशक्तपणाही येतो. त्यामुळे विशेष पेय पदार्थ किंवा पातळ पदार्थांचे सेवन केल्यास शरीरातील पाणी कमी होणे टाळता येते थोड्क्यात डिहायड्रेशन होत नाही.

● डायपेगियाच्या गंभीर रुग्णांसाठी फिडींग ट्यूबचा वापर करावा लागतो. त्यामुळे गिळण्याची प्रक्रिया नीट होत नसेल तर फिडींग ट्यूबच्या साह्याने अन्न दिले जाते.

● असा त्रास होणाऱ्यांनी कमी प्रमाणात खावे. थोडा थोडा वेळाने थोडे खावे. अन्नपदार्थांचे लहान लहान तुकडे करावेत. तसेच खाताना हळुहळु खावे.

डायपेगियामुळे शरीराला आवश्यक ते पोषक घटक शरीरात मिळत नाहीत. तसेच शरीरातील पाणीही कमी होते. अन्न किंवा पाणी हे श्वसनमार्गात जात असल्याने श्वसनाचे प्रश्न निर्माण होतात.

**लक्षणे–**
- सूज येण्याबरोबर वेदना होतात.
- खालेले अन्न घशातच अडकले आहे किंवा छातीत किंवा स्तनांच्या हाडामागे अडकल्याची भावना निर्माण होते.
- अतिप्रमाणात लाळेची निर्मिती
- अन्न घशाशी येणे
- छातीत जळजळ होणे
- पोटातील आम्ल किंवा अन्न पुनःपुन्हा घशाशी येणे
- अनपेक्षित वजनात घट होणे
- गिळताना खोकला येणे किंवा अडकल्यासारखे वाटणे
- गिळताना त्रास होत असल्याने पदार्थांचे छोटे छोटे तुकडे करावे लागणे किंवा काही अन्नपदार्थ वर्ज्य करावे लागणे



सध्या हेडची बुमराहविरुद्धची कामगिरी हे त्याच्या निडर दृष्टिकोनाचे उदाहरण आहे. इतर फलंदाज बुमराहच्या अपारंपरिक कृती, वेगवान आणि सातत्याने अचूक गोलंदाजी विरुद्ध झुंजत असताना, हेडने त्याला इतर कोणत्याही गोलंदाजाप्रमाणे घेतले. — ग्रेग चॅपेल

विराट कोहली आधुनिक क्रिकेटमधला महान फलंदाज म्हणून गणला जातो. असे खेळाडू स्वयंप्रेरित असतात. त्यांच्या स्वत:कडूनच खूप चांगल्या अपेक्षा असतात. खेळात सुधारणेचा त्यांना ध्यास असतो. तेव्हा विराट यशाचा मार्ग शोधून काढेल. —रोहित शर्मा



## के.एल. राहुल खेळणार तिसऱ्या क्रमांकावर

# रोहित शर्मा करणार ओपनिंग?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मेलबर्न :** मेलबर्न कसोटीत भारतीय कर्णधार रोहित शर्मा यशस्वी जैस्वालसोबत सलामी करू शकतो. तर केएल राहुलला क्रमांक-३ वर मैदानात उतरवले जाऊ शकते. एवढेच नाही तर भारतीय संघ बॉक्सिंग-डे कसोटीत २ फिरकीपटूंसह उतरू शकतो. नितीश रेड्डीला डावलले जाऊ शकते. टाईम्स ऑफ इंडियाने आपल्या वृत्तात हा दावा केला आहे. एक दिवस आधी रोहित शर्माने आपल्या फलंदाजीच्या क्रमावर सस्पेंस कायम ठेवला होता.

तो म्हणाला होता- 'कोण कुठे फलंदाजी करेल याची काळजी करू नका. आपण याबद्दल विचार करणे आवश्यक आहे आणि मी येथे चर्चा करत नाही. संघासाठी जे सर्वोत्तम आहे ते आम्ही करू. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी चा चौथा सामना २६ डिसेंबरपासून मेलबर्नच्या एमसीजी मैदानावर खेळवला जाणार आहे. रोहित ५ कसोटी मालिकेतील पहिला सामना खेळला नाही, त्याच्या जागी केएल राहुल सलामीला आला. यानंतर, दोन कसोटींमध्ये राहुलने सलामी दिली आणि रोहित सहाव्या क्रमांकावर आला, पण त्याला केवळ १९ धावा करता आल्या.

दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे रोहित शर्मा पहिल्या कसोटी सामन्यात खेळू शकला नाही. दुसऱ्या कसोटीत तो सलामीवीर म्हणून परतणार होता, पण केएल राहुलने पर्थमध्ये ७७ धावांची दमदार खेळी करत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

अशा स्थितीत कर्णधाराला आपल्या फलंदाजीचा क्रम बदलावा लागला. मात्र, त्याला तीन डावात केवळ १९ धावा करता आल्या. दुसरीकडे, राहुलने तिसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात ८४ धावा करून आघाडीच्या फळीत आपला दावा मजबूत केला. भारतीय संघ सध्या मेलबर्नमध्ये आहे. टीम इंडियाला २६ डिसेंबरपासून बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीचा चौथा सामना ऑस्ट्रेलियासोबत खेळायचा आहे.

५ सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. भारताने १८ डिसेंबर रोजी गाबा कसोटी अनिर्णित ठेवली होती. भारताने पर्थमधील पहिला सामना २९५ धावांनी जिंकला होता, तर ॲडलेडमध्ये खेळल्या गेलेल्या पिंक बॉल कसोटीत यजमान संघाने १० विकेट्सने विजय मिळवला होता.

## मुंडे स्पोर्ट्स, हेमंत पाटील संघांनी उद्‌घाटनाचा दिवस गाजवला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत मुंडे स्पोर्ट्स क्लब आणि हेमंत पाटील ॲकॅडमी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्‌घाटनाचा दिवस गाजवला.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत यश देशमुख याने केलेल्या ८० धावांच्या जोरावर मुंडे स्पोर्ट्स क्लबने मुंबईच्या एसी डायनामाईट संघाचा १४९ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या मुंडे स्पोर्ट्स क्लबने १८ षटकात ७ गडी गमावून २४९ धावांचा डोंगर उभा केला. यश देशमुख याने ३६ चेंडूत ७ चौकार आणि ६ षटकारांसह ८० धावा चोपल्या. संकेत माने याने नाबाद ७९ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना एसी डायनामाईटचा डाव १०० धावांवर आटोपला. अमोल कदम (३८ धावा) आणि ओम साळुंखे (२२ धावा) यांनी लढा दिला. परीक्षीत वालसंगकर





याने ३ गडी तर, वसंत मुंडे याने २ गडी बाद केले.

स्वप्निल फुलपगार याने झळकावलेल्या १३५ धावांच्या खेळीमुळे हेमंत पाटील ॲकॅडमीने मुंडे क्लबचा १६ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या हेमंत पाटील ॲकॅडमीने २३३ धावा धावफलकावर लावल्या. स्वप्निल फुलपगार याने ६५ चेंडूत १६ चौकार आणि ८ षटकारांसह १३५ धावांची खेळी साकारली.

या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंडे स्पोर्ट्स क्लबचा डाव २१७ धावांवर मर्यादित राहीला. यामध्ये ध्रुविल माटकर याने नाबाद ६५ खेळी केली. याशिवाय रविंद्र जाधव (३१ धावा) आणि आकाश पारकर (२८ धावा) आणि विश्वजीत जगदाळे (२७ धावा) यांनीही छोट्या खेळी करून लढत दिली.

## यू मुंबाचा संघ प्ले ऑफमध्ये; बंगाल वॉरियर्सवर मात



**नवी दिल्ली :** यू मुंबा संघाने मंगळवारी बंगाल वॉरियर्स संघावर विजय मिळवताना प्रो कबड्डी स्पर्धेच्या यंदाच्या मोसमात प्ले ऑफमध्ये पोहोचण्याचा मान संपादन केला. यू मुंबाने बंगाल वॉरियर्सचा ३६-२७ असा पराभव केला. या विजयासह यू मुंबाने गुणतालिकेत पाचव्या स्थानावर झेप घेतली. यू मुंबाचा संघ बाद फेरीत प्रवेश करणार हे निश्चित होते. यू मुंबाने मंगळवारी केवळ त्याची औपचारिकता पूर्ण केली. यू मुंबाला बाद फेरी गाठण्यासाठी केवळ एक गुण आवश्यक होता. अखेरच्या दहा मिनिटांत बंगाल संघाच्या बचावफळी आणि प्रणय राणेच्या चढाईने यू मुंबा संघाच्या संयमाची कसोटी पाहिली. अखेरच्या सत्रात एक वेळ बंगालने ११ गुणांचा सपाटा लावला. यू मुंबा संघ त्या वेळेस केवळ दोनच गुण मिळवू शकला होता. पण, तोवर वेळ संपत चालल्यामुळे यू मुंबा संघाला सुटकेचा निश्वास टाकता आला. पूर्वार्धातच काहीशा संथ सुरुवातीनंतर यू मुंबा संघाने अजित चौहानच्या चढाया आणि सुनीलकुमारच्या बचावाने हळूहळू सामन्यावर नियंत्रण मिळवले.

## बेन स्टोक्स ३ महिने क्रिकेटपासून दूर राहणार


**नवी दिल्ली :** इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्स तीन महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट



बोर्डाने (ECB) देखील याला दुजोरा दिला आहे. हॅमिल्टनमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीत त्याच्या डाव्या पायाला दुखापत झाली. पुढील वर्षी जानेवारीत त्याच्यावर शस्त्रक्रिया होणार आहे. ऑगस्टमध्ये द हंड्रेडदरम्यान स्टोक्सला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती, ज्यामुळे त्याला चार कसोटी सामने खेळावे लागले. यानंतर त्याने या महिन्यात न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटीतून पुनरागमन केले. या मालिकेत त्याने भरपूर गोलंदाजी केली, त्यामुळे त्याची दुखापत पुन्हा सावरली आहे. त्याने तिसऱ्या कसोटी सामन्यात ३६.२ षटके टाकली, जी २०२२ नंतर एका कसोटी सामन्यात त्याने टाकलेली सर्वाधिक आहे. या मालिकेत इंग्लंडने किवी संघाचा २-१ असा पराभव केला.

## ६ खंड, २४ देश! पहिल्या खो-खो वर्ल्ड कपसाठी भारत सज्ज

**नवी दिल्ली :** भारतामध्ये पुढील वर्षी (२०२५) जानेवारी महिन्यात जागतिक खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. नव्या वर्षात



पहिल्यांदाच खो-खो वर्ल्ड कप खेळवण्यात येणा आहे. ही स्पर्धा दिल्ली येथे इंदिरा गांधी स्टेडियमवर १३ ते १९ जानेवारी, २०२५ या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेसाठी खो-खो या खेळाच्या विकासाच्या दृष्टीने सहभागी संघांची संख्याही आता वाढवण्यात आली आहे. यापूर्वी पुरुष गटात १६ आणि महिला गटातही १६ संघ सहभागी होणार होते. पण आता ही संख्या वाढवण्यात आली असून पुरुष गटात २१ आणि महिला गटात २० संघ सहभागी होणार आहेत. दोन्ही गटातील संघ मिळून एकूण २४ देशांचे संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. हे २४ संघ विविध ६ खंडातील असून यात आशिया, दक्षिण व उत्तर अमेरिका, युरोप, आफ्रिका आणि ओशिनिया या खंडांचा समावेश आहे. या स्पर्धेच्या तयारीबाबत भारताच्या खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधंशू मित्तल यांनी सांगितले की परदेशी सदस्यांचा विचार करुन सुविधा पुरवत आहे. त्यांच्या आहाराची गरज लक्षात घेऊन योजना केली आहे. तसेच रहाण्याची व येण्या-जाण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. ही स्पर्धा एक आदर्श स्पर्धा ठरेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. या स्पर्धेतील पहिलाच सामना १३ जानेवारीला भारत विरुद्ध पाकिस्तान संघात खेळवला जाणार आहे.

## एसएम क्रिकेट ॲकॅडमी संघाची विजयी आगेकूच!



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत रेयान मोमीन याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे एसएम क्रिकेट ॲकॅडमीने बीएस्पोर्ट्स ॲकॅडमीचा ४५ धावांनी पराभव करून आगेकूच केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत पहिल्यांदा फलंदाजी करताना एसएम क्रिकेट ॲकॅडमीने ३४.४ षटकात १९२ धावांचे आव्हान उभे केले.

विद्याधर कांबळे याने ७० धावांची खेळी केली. याशिवाय रेयान मोमीन (३१ धावा), सलमान शेख (२६ धावा) आणि ओंकार लोमटे (२७ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. या लक्ष्याचा पाठलाग करताना बीएस्पोर्ट्स ॲकॅडमीचा डाव २७.३ षटकामध्ये १४७ धावांवर मर्यादित राहीला. बीए ॲकॅडमीकडून समर्थ धावरे (३४ धावा) आणि शिवम पाटील (३० धावा) यांनी छोट्या खेळी करून लढा दिला. रझ्झाक याने ३२ धावांत ३ गडी तर, रेयान मोमीन याने ५४ धावांमध्ये ३ गडी टिपत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## डीपीएस डायनामोज, सिंगापूर थंडरबोल्ट संघांचा दुसरा विजय

**पुणे :** क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक 16 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत डीपीएस डायनामोज, सिंगापूर थंडरबोल्ट या संघांनी सलग दुसरा विजय मिळवला.

शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत विवेक शर्मा (27 व 3-10) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर डीपीएस डायनामोज संघाने क्रिककिंगडम युनायटेड संघाचा 158धावांनी धुव्वा उडविला.

दुसऱ्या सामन्यात तरुण (1-9 व 36) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर क्रिशु नाईट्स संघाने ओडीएम ग्लॅडिएटर्स रांची संघाचा 7 गडी राखून पराभव करत विजयी सुरुवात केली. अन्य लढतीत वरदान खन्ना(3-15) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर सिंगापूर थंडरबोल्ट संघाने ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वर संघाचा 9 गडी राखून पराभव करत विजयी मालिका कायम राखली.

## सांगलीत रंगणार कुमार राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पिंपरी-चिंचवड विरुद्ध पालघर, यजमान सांगली विरुध्द उस्मानाबाद या कुमारी गटाच्या उद्‌घाटनीय सामन्या बरोबरच अन्य चार सामन्याने सांगलवाडी, सांगली येथील "५१व्या कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होईल. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने युवक मराठा क्रीडा संस्था यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

गत वर्षापासून या स्पर्धेत ६ संघांची वाढ केल्याने सहभागी होणाऱ्या ३१ संघांची ८ गटात विभागणी करण्यात आली आहे. सांगलवाडी, सांगली येथील चिंचबाग मैदानावर होणारी ही स्पर्धा मातीच्या ६ क्रीडांगणावर खेळविण्यात येणार आहे. या



स्पर्धेचे उद्‌घाटन शनि. दिनांक २८ डिसेंबर रोजी सकाळी ०८-३० वाजता करण्यात येईल. सामने सकाळ व सायंकाळ या दोन्ही सत्रात खेळविले जातील याची सर्व सहभागी संघाच्या व्यवस्थापक, प्रशिक्षक, संघनायक यांनी नोंद घ्यावी. या स्पर्धेची गटवारी राज्य कबड्डी असो.चे सचिव बाबुराव चांदेरे यांनी आज प्रसार माध्यमकरीता जाहीर केली.

### कुमारी(मुली) गट

- १)अ गट :- १)पिंपरी-चिंचवड, २)नाशिक शहर, ३)पालघर.
- २)ब गट :- १)पुणे ग्रामीण, २)सोलापूर, ३)पुणे शहर, ४) औरंगाबाद.
- ३)क :- १)मुंबई उपनगर - पूर्व, २)ठाणे ग्रामीण, ३) जळगांव, ४) जालना.
- ४)ड :- १)कोल्हापूर, २)धुळे, ३) नाशिक ग्रामीण, ४)हिंगोली.
- ५)इ :- १)मुंबई उपनगर-पश्चिम, २)परभणी, ३)नंदुरबार, ४)नांदेड.
- ६)फ :- १)सांगली, २)मुंबई शहर-पूर्व, ३)बीड, ४)उस्मानाबाद.
- ७)ग :- १)अहमदनगर, २) रायगड, ३)सातारा, ४)लातूर.
- ८)ह :- १)सिंधुदुर्ग, २)मुंबई शहर-पश्चिम, ३)ठाणे शहर, ४) रत्नागिरी.

## सर्वोत्तम खेळ करणारा संघ जिंकणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बाद फेरीत चुकांना संधी नसते. सर्वोत्तम खेळ करणारा संघच येथे जिंकणार. मोठ्या लढतींचा दबाव कुठला संघ व्यवस्थित हाताळतो, यावरही बरेच काही अवलंबून असते, असे मत प्रो-कबड्डी लीगच्या बाद फेरीत दाखल झालेल्या संघाच्या प्रशिक्षकांनी व्यक्त केले.

हरियाणा स्टीलर्स आणि दबंग दिल्ली या संघांनी यंदाच्या मोसमात गुणतक्त्यात अनुक्रमे पहिला आणि दुसरा क्रमांक मिळवून थेट उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. त्यानंतर आता यूपी योद्धाज वि. जयपूर पिंक पँथर्स यांच्यात एलिमिनेटर -१, तर पाटणा पायरेट्स वि. यू मुम्बा यांच्यात एलिमिनेट-२ लढत रंगणार आहे. या



लढती म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडानगरीत होणार आहेत. या पार्श्वभूमीवर हरियाणाचे प्रशिक्षक मनप्रीत सिंग, दिल्ली संघाचे प्रशिक्षक जोगिंदर नरवाल, यूपी संघाचे प्रशिक्षक जसवीरसिंग, पाटणा संघाचे प्रशिक्षक नरेंदर रेधू, यू मुम्बा संघाचे प्रशिक्षक घोलमरेझा माझांदरनी, जयपूर संघाचे प्रशिक्षक संजीव बलियान पत्रकार परिषदेत एकत्र आले होते.

हरियाणा संघाचे प्रशिक्षक मनप्रीतसिंग म्हणाले, येथे प्रत्येक संघ जिंकायलाच आला आहे. आता स्पर्धा अधिक तिव्र झाली आहे. आम्ही शंभर टक्के देण्याचा प्रयत्न करणार आहोत. आमचा प्रतिस्पर्धी कोण याचा विचार न करता आमच्या जमेच्या बाजूंवर आम्ही लक्ष केंद्रित करणार आहोत. थेट उपांत्य फेरीत प्रवेश केल्याने आमचा आत्मविश्वास वाढला आहे. दिल्लीचे प्रशिक्षक जोगिंदर म्हणाले, जो संघ चांगला खेळणार, तो जिंकणारच. आमची संघ बांधणी मजबूत असून, याचे श्रेय माझ्यापेक्षा खेळाडूंनाच आहे. हीच एकजूट आम्ही उपांत्य फेरीत दाखविणार आहोत.

पाटणा संघाचे प्रशिक्षक नरेंदर म्हणाले, या मोसमात आम्ही काही लढती अखेरच्या क्षणी जिंकल्या आहेत. त्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला आहे. शेवटच्या क्षणी कच न खाणे हे आमच्या संघाचे वैशिष्ट्ये आहे. नैसर्गिक खेळावर भर देण्याचा आमचा प्रयत्न असेल.

## ख्रिसमसच्या मुहूर्तावर रोनाल्डोची फॅमिली ट्रीप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ख्रिसमस सण २५ डिसेंबर रोजी जगभरात धुमधडाक्यात साजरा केला जातो. ख्रिस्ती बांधवांचा हा मोठा सण मानला जातो. फक्त ख्रिस्ती बांधवच नाही, तर जगभरातील इतर लोकही उत्साहाने ख्रिसमस साजरा करतात.

काही लोकं हा सण घरी कुटुंबासोबत साजरा करतात, तर काही लोकं ख्रिसमस साजरा करण्यासोबत बाहेर फिरायला देखील जातात. ख्रिसमसच्या मुहुर्तावर स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो कुटुंबासह फिरायला गेला आहे. रोनाल्डोने दोन मुलं, दोन मुली व पत्नीसह ख्रिसमस सण साजरा



केला. तो बर्फाळ प्रदेशात कुटुंबासह ट्रीपवर गेला आहे. तो आपल्या मुलांना सांताक्लॉजमार्फत संस्कृतीचे (सणाचे) महत्त्व सांगताना पाहायला मिळाला. रोनाल्डोने कुटुंबासह पार्टी करतानाचा व्हिडीओ आपल्या युट्यूब चॅनेलवर अपलोड केला आहे. या ट्रीपवरचा आणखी एक व्हिडीओ रोनाल्डोने शेअर केला.

## मेव्हरिक्स लिजेंडस, शंतनु शुटर्स संघ उपांत्य फेरीत

**पुणे :** कै.ला.सागर डोमसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित कै. सागर डोमसे प्रौढ(४०वर्षांवरील) करंडक टी -२०क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत मेव्हरिक्स लिजेंडस, शंतनु शुटर्स या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. फोर स्टार मैदान हिंजवडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या सामन्यात पुष्कराज जोशी(३-१८) याने केलेल्या शिस्तबध्द गोलंदाजीच्या जोरावर दिक्षित रॉयल्स संघाने लवास संघाचा ७ गडी राखून पराभव केला. दुसऱ्या लढतीत धीरज कदम याने केलेल्या उपयुक्त ४७ धावांच्या खेळीच्या जोरावर मेव्हरिक्स लिजेंडस संघाने रॉयल पासलकर संघाचा ७ गडी राखून पराभव करत उपांत्य फेरी गाठली. अन्य लढतीत समीर तांबोळी(३-१५) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर शंतनु शुटर्स संघाने गार्गी एज्यूकॉन संघाचा ८ गडी राखून पराभव करत तिसऱ्या विजयासह उपांत्य फेरीत प्रवेश केला.

## सहाव्या आरकेजी स्नुकर अजिंक्यपद १०-रेड स्नुकर स्पर्धा

# हरयाणाच्या दिग्विजय कडीयान याला विजेतेपद !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देवभुमी बिलीयर्ड आणि स्नुकर असोसिएशन, दिल्ली बिलीयर्डस् आणि स्नुकर असोसिएशन आणि पुणे जिल्हा बिलीयर्ड आणि स्नुकर संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहाव्या आरकेजी स्नुकर अजिंक्यपद १०-रेड स्नुकर स्पर्धेची पुणे पात्रता फेरीत हरयाणाच्या आणि राष्ट्रीय युवा खेळाडू दिग्विजय कडीयान याने पुण्याचा तहा खान याचा पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.



वडगांवशेरी येथील द क्यु क्लब येथे झालेल्या या स्पर्धेत सध्याचा सब-ज्युनिअर गटात अव्वल तीन खेळाडूंमध्ये मानांकन असलेल्या आणि २२ वर्षीय दिग्विजय याने तहा खान याने कडवे आव्हान ५-३ असे मोडून काढून विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यामध्ये सुरूवातीलाच दिग्विजय याने ५१-२२ अशी फ्रेम जिंकून छान सुरूवात केली. पण, तहा खान यानेसुद्धा ४४-१२ अशी दुसरी फ्रेम आणि ५२-२९ अशी तिसरी जिंकत आपले आव्हान सिद्ध केले. चौथी फ्रेम दिग्विजय ने ३९-२१ अशी जिंकून सामन्यामध्ये २-२ अशी बरोबरी निर्माण केली. पाचवी फ्रेम ४२-११ अशी जिंकून तहा याने ३-२ अशी आघाडी निर्माण केली. यानंतर दिग्विजय याने आपल्या लौकिकास खेळ करून सलग ४८-२४, ३९-३२, ४१-२७ अशा तीन फ्रेम जिंकत सामना खिशात घातला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेचे संचालक मनमीतसिंग भाटीया आणि भारतीय बिलीयर्डस् व स्नुकर फेडरेशनचे माजी उपाध्यक्ष राजन खिंवसरा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्यु क्लबचे अलेक्स् रेगो, लोकेश दिवाणे, खेळाडू आदि मान्यवर उपस्थित होते.

## बॉक्सिंग स्पर्धेचे उद्‌घाटन संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नुकत्याच बिना इंग्लिश मीडियम स्कूल येथे क्रीडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा परिषद व पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय थाई बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा २०२४ उद्‌घाटन शरनपाल कौर जितू कटारिया यांच्या हस्ते स्पर्धेची प्रथम लढत लावत उद्‌घाटन केले. त्याप्रसंगी भारतीय थाई बॉक्सिंग महासंघाचे अध्यक्ष पाशा आत्तार, रविराज गाढवे- सचिव पिंपरी चिंचवड थाई बॉक्सिंग गणेश मांढरे, अभिषेक शिंदे, प्रियंका अचमट्टी, कारभारी गायकवाड, किरण माने बॉक्सिंग कोच जितू, कटारिया क्रीडा संघटक सुनील साठे इत्यादी मान्यवर उपस्थित



होते. सूत्रसंचालन गणेश मांढरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन अकमल खान बिना इंग्लिश मीडियम स्कूलचे सेक्रेटरी यांनी केले व खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सरस्वती भुवन इंग्लिश मीडियम स्कूल पिंपळे गुरव या स्कूलच्या खेळाडूंनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी केली म्हणून माझी आमदार अश्विनीताई जगताप यांच्या हस्ते या विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी शाळेच्या संस्थापिका जागृती धर्माधिकारी शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कांबळे, वैशाली दिंडाळ, प्रायमरी मुख्याध्यापिका माया बायस सेक्रेटरी राजेश मनाकांत, क्रीडा शिक्षक सुनील साठे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सुनील साठे यांचे मार्गदर्शन लाभले.

जय भीम



नामदार

# रामदास आठवले

यांच्या वाढदिवसानिमित्त

## हार्दिक शुभेच्छा !

: शुभेच्छुक :

भीम आर्मी

जीत आठवले फाउंडेशन, मुंबई-नवी मुंबई

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया
कांदिवली - बोरिवली मुंबई प्रांत